रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक १०४
www.ramprahar.com
मंगळवार, ३१ ऑक्टोबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग
करंजाडेकरांना लवकरच मिळणार छानसे उद्यान/२
मिठेखारच्या सरपंचपदी भाजपचे अशोक वाघमारे बिनविरोध/५
राज्य कॅरम स्पर्धेत प्रशांत मोरे, अंबिका हरिथ विजेते/८

## मुख्यमंत्र्यांनी घेतली राज्यपालांची तातडीची भेट




**मुंबई** : राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी (दि. ३०) रात्री राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन येथे भेट घेतली. राज्यात मराठा आरक्षणाचे आंदोलन पेटले आहे. मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांचे उपोषण सुरूच असून त्यांची प्रकृती ढासळत आहे, तर दुसरीकडे आंदोलकांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. त्यामुळेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी तातडीने राज्यपालांची भेट घेतल्याचे म्हटले जात आहे. राज्यात मराठा आरक्षणावरून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित होत असल्याने राज्यपालांना याची माहिती देण्यासंदर्भात व यातून मार्ग काढण्याबाबत ही भेट असल्याचेही सांगितले जात आहे. मुख्यमंत्री व त्यांचे मंत्रिमंडळातील सहकारी मराठा आरक्षण प्रक्रियेसाठी कार्यरत आहेत.

# मराठा समाजाला न्यायालयात टिकणारे आरक्षण देण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न

## मराठा बांधवांनी टोकाचे पाऊल उचलू नये -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठा समाजाला न्यायालयात टिकणारे आरक्षण देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. निवृत्त न्यायमूर्ती श्री.भोसले, श्री.गायकवाड आणि श्री.शिंदे यांची समिती गठीत करण्याचा निर्णय घेतला असून ही समिती मराठा आरक्षण देण्यासंदर्भात आणि मराठा आरक्षण न्यायालयात टिकण्यासंदर्भात मार्गदर्शन करेल, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी (दि. ३०) पत्रकार परिषदेत दिली.



मराठा आरक्षण आणि सुविधांसाठी गठित केलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे झाली. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. या वेळी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री तथा मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन, सार्वजनिक बांधकाममंत्री दादाजी भुसे, सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील, राज्य उत्पादन शुल्कमंत्री शंभूराज देसाई, उद्योगमंत्री उदय सामंत, शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मराठवाड्यातील मराठा समाजास मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेमध्ये आवश्यक त्या अनिवार्य पुराव्यांची वैधानिक व प्रशासकीय तपासणी करण्याबाबत तसेच तपासणीअंती मराठा समाजास मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र देण्याची कार्यपद्धती विहित करण्यासाठी गठीत केलेल्या न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) यांच्या समितीचा अहवाल उद्या मंत्रिमंडळ बैठकीत स्वीकारला जाईल.


न्या. शिंदे समितीने आतापर्यंत एक कोटी ७३ लाख ७० हजार ६५९ नोंदी तपासल्या असून ११ हजार ५३० कुणबी जातीच्या नोंदी आढळल्या आहेत. मराठवाड्यातील जुन्या नोंदी तपासताना उर्दू आणि मोडी भाषेतील कागदपत्रांचे मराठी भाषांतर करून घेण्याचे काम सुरू आहे.

सर्वोच्च न्यायालयाने क्युरेटिव्ह याचिका दाखल करून घेण्यास संमती दिल्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेचे कामसुद्धा अधिक गतीने सुरू आहे. मराठा आरक्षणासंदर्भात न्यायालयीन लढाईसाठी स्थापन केलेल्या वरिष्ठ वकिलांच्या टास्क फोर्सची बैठकसुद्धा लवकरच घेण्यात येईल, मात्र तोपर्यंत सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणाचा निर्णय फेटाळताना जी निरीक्षणे नोंदविली तिचा अभ्यास मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष निवृत्त न्यायमूर्ती श्री.निरगुडे करतील. **(पान २ वर..)**

## बीडमध्ये जाळपोळ; घरे, कार्यालय पेटवले संचारबंदी लागू

**बीड : प्रतिनिधी**

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे-पाटील यांनी उपोषण सुरू केले असताना दुसरीकडे राज्यात काही ठिकाणी जाळपोळीच्या घटना घडत आहेत. बीडमध्ये नेत्यांची घरे तसेच पक्ष कार्यालय पेटवून दिल्याचा प्रकार सोमवारी (दि. ३०) घडला. यानंतर बीड जिल्ह्यात संचारबंदी लागू करण्यात आली आहे.



मराठा आंदोलक नेते मनोज जरांगे-पाटील यांच्याबद्दल वक्तव्य केल्याच्या आरोपातून जमावाने माजलगावमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या घराला आग लावली. याशिवाय बीडमध्ये राष्ट्रवादीचे आमदार संदीप क्षीरसागर आणि ओबीसींचे ज्येष्ठ नेते जयदत्त क्षीरसागर हे राहत असलेला बंगला पेटवून दिला. राष्ट्रवादीचे कार्यालय तसेच राजकीय पक्षांशी संबंधित हॉटेल, संस्थांच्या कार्यालयाचीही जाळपोळ केली गेली. दरम्यान, या पार्श्वभूमीवर जरांगे-पाटील यांनी शांततेचे आवाहन केले आहे.

# भाजप महायुतीच्या उमेदवारांना विजयी करा -आमदार प्रशांत ठाकूर

## विचुंबेत प्रचार रॅली; नागरिकांचा प्रतिसाद



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशात आणि राज्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली अनेक विकासकामे होत असून विचुंबे ग्रामपंचायतीमधील विकासाची गाडी आणखी वेगाने धावण्यासाठी तुमच्या सर्वांच्या सहकार्याची आवश्यकता आहे. त्यामुळे ५ नोव्हेंबरला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सबका साथ, सबका विकास या सूत्राला मतदान करून भाजप महायुतीचे थेट सरपंचपदाचे उमेदवार प्रमोद भिंगारकर यांच्यासह सदस्यांना विजयी करा, असे आवाहन भाजप मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर रविवारी (दि. २९) प्रचारादरम्यान केले, तर या वेळी प्रमोद भिंगारकर यांनी विचुंबे ग्रामपंचायत टँकरमुक्त करू, अशी ग्वाही दिली.

पनवेल तालुक्यात ग्रामपंचायत निवडणूक होत आहे. विचुंबे येथील निवडणुकीत भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, मनसे आणि रिपाइं महायुतीच्या थेट सरपंचपदाचे उमेदवार प्रमोद भिंगारकर तसेच सदस्यपदासाठी प्रभाग क्रमांक १मधून निकिता म्हात्रे, श्याम म्हात्रे, संदीप पाटील; प्रभाग २मधून ज्योती भोईर, कंकेश गोंधळी, प्रितेश भिंगारकर; प्रभाग ३मधून श्रावणी भोईर, प्रगती गोंधळी, अनिल भोईर; प्रभाग ४मधून विभुती सुरते, आरती गायकवाड, नितीन भोईर आणि प्रभाग ५मधून भाग्यश्री भोईर, भावना साधू, अनंता गायकवाड उभे आहेत. या उमेदवारांच्या प्रचारार्थ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली प्रचार रॅली काढण्यात आली होती.

या रॅलीत भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, प्रल्हाद केणी, एस.के.नाईक, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, माजी नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ, तेजस कांडपिळे, अजय बहिरा, माजी जि.प. सदस्य अमित जाधव, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, माजी उपसरपंच किशोर सुरते, अप्पा भागीत, के. सी.पाटील, नितीन भोईर, डी. के.भोईर, विवेक भोईर, नयन भोईर, राम म्हात्रे, महेश भिंगारकर, अविनाश गायकवाड, चेतन सुरते, जयवंत भिंगारकर, प्रल्हाद भोईर, आनंद गोंधळी, जगदीश भोईर, प्रेम भिंगारकर, हरेश जळे, महेंद्र म्हात्रे, संदीप भिंगारकर, चेतन भिंगारकर, अमिता म्हात्रे, अक्षता गायकवाड, संगीता भोईर, नवीता भोईर, सुनीता भोईर, मानसी भोईर, सोनम म्हात्रे, हर्षदा भिंगारकर, प्रतिभा म्हात्रे, शर्मिला जाधव, बनाकाकू म्हात्रे, स्वाती सुरते यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निवडक

### आमदार अपात्रतेसंदर्भात ३१ डिसेंबरची डेडलाईन

**नवी दिल्ली** : शिवसेना आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय ३१ डिसेंबरपूर्वी घ्या, असे निर्देश सरन्यायाधीश डी. वाय चंद्रचूड यांनी दिले आहेत. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या वतीने वकील तुषार मेहतांनी युक्तिवाद करीत दिवाळीच्या सुट्ट्या, हिवाळी अधिवेशनाचा मुद्दा मांडला. तरीही वेळ वाढवून देण्यास न्यायालयाने नकार दिला आहे.

### पाक निवड समिती प्रमुखपदाचा इंझमाम-उल-हककडून राजीनामा

**नवी दिल्ली** : भारतात सुरू असलेल्या वनडे वर्ल्डकपमधील खराब कामगिरीनंतर पाकिस्तान संघाचा निवड समिती प्रमुख इंझमाम-उल-हकने पदाचा राजीनामा दिला आहे. त्याच्यावर हितसंबंधांच्या संघर्षाबाबतचा आरोप झाला होता.

## अभिनंदन अन् शुभेच्छा!




**पनवेल : भाजप युवा मोर्चाच्या शहर मंडल अध्यक्षपदी सुमित झुंझारराव आणि महिला मोर्चा शहर मंडल अध्यक्षपदी राजश्री वावेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सोमवारी भेट घेऊन आशीर्वाद घेतले. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेविका वृषाली वाघमारे, रूचिता लोंढे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, अमेय देशमुख, प्रवीण मोरबाळे, विजय शिंदे, सागर मेहेर, स्वरूप वाणी, महेंद्र वावेकर, यमुना प्रकाशन, अनिता रणदिवे, सोनू चिखलेकर, यशोदा कोळी, मनीषा बागूल आदी उपस्थित होते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.**

## 'विराट' बर्थडेसाठी ईडन गार्डन्सवर जोरदार तयारी

**कोलकाता : वृत्तसंस्था**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील सामना भारतीय संघासाठी खास असणार आहे, कारण याच दिवशी अर्थात ५ नोव्हेंबरला संघाचा माजी कर्णधार आणि आघाडीचा फलंदाज विराट कोहलीचा ३५वा वाढदिवस आहे. हा सामना कोलकात्यातील ईडन गार्डन्स मैदानावर होणार असून किंग कोहलीच्या बर्थडेसाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे.



विराट कोहलीचा वाढदिवस संस्मरणीय बनवण्यासाठी बंगाल क्रिकेट असोसिएशनने विशेष तयारी केली आहे. खरंतर या दिवशी स्टेडियममध्ये अंदाजे ७० हजार चाहते विराट कोहलीच्या मास्कमध्ये दिसतील. याशिवाय स्पेशल केक कापला जाणार आहे तसेच विराटच्या वाढदिवसानिमित्त ईडन गार्डन्समध्ये लेझर शोचे आयोजन करण्यात येणार आहे.

मिळालेल्या वृत्तानुसार फटाक्यांच्या आतषबाजीत किंग कोहलीला शुभेच्छा दिल्या जातील. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील सामना भारतीय वेळेनुसार दुपारी २ वाजता सुरू होईल. रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ दक्षिण आफ्रिकेला हरवून विराट कोहलीला विजयाची भेट देण्यासाठी प्रयत्नशील असेल. सध्या भारतीय संघ गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे. भारतीय संघाने आतापर्यंत सर्व सहा सामने जिंकले असून १२ गुणांसह संघाने उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.

विराट कोहलीने आतापर्यंत सहा सामन्यांत ८८.५०च्या सरासरीने ३५४ धावा केल्या आहेत. तो त्याच्या वाढदिवशी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध नक्कीच मोठी खेळी करेल, अशी आशा भारतीय चाहत्यांना आहे.

## 'शिक्षण हीच विकासाची गुरुकिल्ली'

**मुंबई : प्रतिनिधी**

शिक्षण हीच विकासाची गुरुकिल्ली आहे. शिक्षण व कौशल्याच्या माध्यमातूनच आदिवासी-जनजाती समाज उन्नती साधू शकेल व राष्ट्र विकासात योगदान देऊ शकेल. यास्तव आदिवासी युवक-युवतींनी शिक्षणाची कास धरावी. तसेच नक्षलवाद्यांच्या विरोधात पुकारलेल्या लढ्यात देशाला साथ द्यावी, असे आवाहन राज्यपाल रमेश बैस यांनी सोमवारी (दि.३०) येथे केले.

बिहार, झारखंड, तेलंगणा व आंध्र प्रदेश या चार राज्यांमधील नक्षलग्रस्त जिल्ह्यातील २०० युवक-युवतींनी राज्यपाल श्री. बैस यांची राजभवन येथे भेट घेतली. त्या वेळी ते बोलत होते. विधानमंडळाच्या वि.स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचे संचालक नीलेश मदाने, नेहरू युवा केंद्राचे महाराष्ट्र व गोवा संचालक प्रकाशकुमार मनुरे, उपनगर युवक अधिकारी निशांत रौतेला, केंद्रीय राखीव पोलीस दल कमांडंट इंद्राणी यादव उपस्थित होते.

# रायगडात कुष्ठरुग्ण शोध अभियान आणि सक्रिय क्षयरोग शोध मोहीम

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्ह्यात कुष्ठरुग्ण शोध अभियान व सक्रिय क्षयरोग शोध मोहीम राबविण्यात येत आहे. मोहिमेदरम्यान आशासेविका, स्वंयसेवक व आरोग्य कर्मचारी घरोघरी सर्वेक्षण करून संशयित कुष्ठरुग्ण व क्षयरोग रुग्ण शोधणार आहे. जनजागृती, तपासणी व उपचार या त्रिसुत्रीने संयुक्त कुष्ठरोग शोध अभियान व सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहीम यशस्वी करण्याच्या सूचना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी सोमवारी (दि.३०) आढावा बैठकीत दिल्या आहेत. या मोहिमेअंतर्गत ३५४ पर्यवेक्षकांच्या नेतृत्वाखाली एक हजार ९५८ पथके स्थापन करण्यात आली आहेत.




रायगड सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) व जिल्हा क्षयरोग अधिकारी यांच्या सयुक्त विद्यमाने सोमवारी कुष्ठरोग व सक्रिय क्षयरुग्ण शोध अभियान २०२३ जिल्हा समन्वय समितीची बैठक डॉ. भरत बास्टेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. शोध अभियानादरम्यान नागरिकांनी क्षयरोग व कुष्ठरुग्ण या आजाराबाबत गैरसमज व भीती न बाळगता घरी येणाऱ्या पथकाला सहकार्य करावे, असे आवाहनही डॉ. बास्टेवाड यांनी या वेळी केले.

कुष्ठरुग्ण शोध अभियान व सक्रिय क्षयरोग शोध मोहिमेंतर्गत जिल्ह्यातील २४ लाख ५६ हजार ८७१ लोकसंख्येचे सर्वेक्षण करण्यात येणार असून गृहभेटीदरम्यान पाच लाख ६९ हजार ४९२ घरांचे भेटीचे नियोजन केले आहे. एक हजार ९५८ पथके तयार करण्यात आली आहेत. मोहिमेंतर्गत घरातील सर्व सदस्यांची कुष्ठरोग व क्षयरोगसंदर्भात संपूर्ण शारीरिक तपासणी करण्यात येणार आहे.

या बैठकीला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनीषा विखे, सहाय्यक संचालक कुष्ठरोग डॉ. प्रताप शिंदे, जिल्हा क्षयरोग अधिकारी सचिन जाधव उपस्थित होते.

### मोहिमेचा उद्देश

समाजातील निदान न झालेले कुष्ठरुग्ण लवकरात लवकर शोधून त्यांच्यावर औषधोपचार करणे, नवीन कुष्ठरुग्ण शोधून बहुविध औषधोपचाराद्वारे संसर्गाची साखळी खंडित करून होणारा प्रसार कमी करणे, क्षयरोगाचे निदानाअभावी अद्यापही वंचित असणाऱ्या क्षयरुग्णांचा शोध घेऊन त्यांना क्षयरोग औषधोपचाराखाली आणणे, संशयित क्षयरुग्णांचे थुंकी नमुने व एक्स-रे तपासणी तसेच आवश्यकतेनुसार इतर तपासणी करून क्षरोगाचे निदान करणे आणि औषधोपचार करणे कुष्ठरुग्ण शोध अभियान व सक्रिय क्षयरोग शोध मोहिमेचा उद्देश आहे, अशी माहिती या वेळी देण्यात आली.

# उद्योग वाढविण्यासाठी उपक्रम हाती घ्यावेत

## विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या सूचना

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात जागतिक गुंतवणूक वाढविण्याच्या दृष्टीने विविध देशांशी परस्पर समन्वय वाढण्यासाठी विशेष प्रयत्न व्हावेत, स्टार्टअप आणि नवोपक्रम सुरू करणाऱ्यांना विशेष प्रोत्साहन मिळावे, गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी मॅग्नेटिक महाराष्ट्र उपक्रम अधिक व्यापकपणे आणि नियोजनबद्ध पद्धतीने राबवावा, असे निर्देश विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उद्योग विभागाला दिले. आगामी हिवाळी अधिवेशनाच्या सुरुवातीला नागपूर येथे महिला उद्योजकांना व्यासपीठ मिळण्याच्या दृष्टीने नियोजन करावे आणि त्यात महाराष्ट्र उद्योग क्षेत्रात करत असलेल्या प्रगतीचा आढावा प्रदर्शनाच्या माध्यमातून घ्यावा, अशा सूचनाही त्यांनी सोमवारी (दि. ३०) केल्या.



उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी विधानभवनात भारत आणि विविध देशांतील व्यापार-उद्योगास चालना देण्याच्या अनुषंगाने बैठक आयोजित केली होती. त्यावेळी त्या बोलत होत्या. उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. बिपीन शर्मा, ग्लोबल इंडिया बिझनेस फोरमचे अध्यक्ष डॉ. जितेंद्र जोशी, महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, पुणेचे सदस्य डॉ. विजय मालापुरे, सागर नागरे यांच्यासह उद्योग क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. या वेळी उद्योग विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह दूरदृश्यसंवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते.

या बैठकीत उद्योगाशी निगडित असणाऱ्या उद्योजकांच्या विविध संस्था व उद्योग विभागांमध्ये समन्वय साधून व्यवसाय वाढीच्या दृष्टीने प्रयत्न व्हावा, या अनुषंगाने चर्चा झाली. यापूर्वी महाराष्ट्र आणि विविध देश यांच्यात झालेले सामंजस्य करार, सद्यस्थिती याबाबतही उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी आढावा घेतला. आफ्रिकेत व्यवसायसंबंधी काय काम करता येईल. महिला उद्योजकांना उद्योग सुरु करण्याच्या अनुषंगाने अधिक सुलभता देणे, त्या अनुषंगाने धोरण राबविणे, परदेशात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची सुविधा, विविध विद्यापीठे आणि शासकीय विभाग यांच्यामध्ये आदानप्रदान वाढवून उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशीप प्रोग्राम राबविणे आवश्यक असल्याचे उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

प्रधान सचिव डॉ. कांबळे म्हणाले की, राज्याचे स्वत:चे उद्योग धोरण आहे. अधिकाधिक गुंतवणूक राज्यात यावी यासाठी विविध माध्यमातून आपण प्रयत्न करीत आहोत. या प्रक्रियेत येथील उद्योजक संघटनांचे तसेच जगभरातील महाराष्ट्र मंडळ आणि तेथील स्थानिक महाराष्ट्रीयन मंडळींचे सहकार्य निश्चितपणे महत्त्वाचे ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. जोशी यांनी ग्लोबल इंडिया बिझनेस फोरममार्फत राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली, तर डॉ. विजय मालापुरे यांनी राज्यातील उद्योग व्यवसायाच्या वाढीसाठी आणि उद्योजकांना प्रशिक्षण देण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे सहकार्य असेल, असे सांगितले.

# सराईत चेन स्नॅचर मानपाडा अडकला पोलिसांच्या जाळ्यात

**पनवेल : वार्ताहर**

मानपाडा परिसरात चेन स्नॅचिंगच्या घटना वाढल्याचे पोलिसांच्या लक्षात येताच पोलिसांनी कसोशीने तपास करून दोघा चोरट्यांना ताब्यात घेतले आहे. यामुळे इतर चेन स्नॅचिंगच्या गुन्ह्यांचीही उकल होण्याची शक्यता आहे.



प्राथमिक शिक्षक रवी सोन्या गवळी (वय ४२) हे मानपाडा रोडवर मॉर्निंग वॉक करीत डी मार्टसमोरील रोडने जात असताना दुचाकीवरील दोन अनोळखी चोरट्यांनी येत गवळी यांच्या गळ्यातील १८ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन जबरदस्तीने खेचून त्यांना जखमी करून पळून गेले होते. त्यांनी दिलेल्या तकारीवरून मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हा दाखल झाल्यानंतर मानपाडा पोलीस व गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदारांनी तत्काळ तपास सुरू केला. तपासादरम्यान गोपनिय बातमीदाराकडून तसेच तांत्रिक माहिती मिळविली असता, हे आरोपी नवी मुंबई, तळोजामार्गे डोबिंवलीकडे येत असल्याचे समजताच मानपाडा पोलिसांनी निसर्ग हॉटेलसमोरील रोडवर साध्या वेशात तीन ठिकाणी सापळा रचला. आरोपींना संशय आल्याने त्यांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांचा हा प्रयत्न मानपाडा पोलिसांनी हाणून पाडला आणि दोघांनाही ताब्यात घेतले. वारिस मिराज खान (वय २४) आणि मोहम्मद जाफर कुरेशी (वय ३०) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. त्यांनी कल्याण, कोळसेवाडी व डोबिंवली परिसरात चेन स्नॅचिंगचे एकूण आठ गुन्हे व दुचाकी चोरीचा एक गुन्हा केल्याची पोलिसांकडे कबुली दिली आहे.

या सर्व गुन्ह्यामध्ये एकूण आठ लाख ६८ हजार ५०० रूपये किंमतीचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

## कळंबोलीतील ओपन जीमची दुरुस्ती करण्याची मागणी

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीमूधन बसविलेल्या ओपन जीमची दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी भाजप कळंबोली मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी पनवेल महापालिका आयुक्तांना निवेदन दिले आहे.

रविनाथ पाटील यांनी निवेदनात म्हटले आहे की, आमदार प्रशांत ठाकूर व नगरसेवक यांच्या निधीमधुन बसवण्यात आलेली ओपन जीमचे मेन्टेनन्स होत नसल्याने नागरिकांना त्या जिमचा उपभोग घेता येत नाही. प्रभाग समिती ब मधील सर्व ओपन जिम दुरूस्त करून नागरिकांसाठी वापर होईल असे करावे.

# चिरनेरमध्ये भाजपच्या प्रतिक गोंधळी यांचे इंडिया आघाडीच्या उमेदवारांसमोर आव्हान

**उरण : वार्ताहर**

तालुक्यातील चिरनेर ग्रामपंचायतीची निवडणूक येत्या ५ नोहेंबर रोजी होणार असून इंडिया आघाडीविरोधात भाजप असा या सामना होणार आहे. भाजपने या निवडणुकीत नवखे तरूण उमेदवार प्रतिक गोंधळी यांना उमेदवारी दिली असून इंडिया आघाडीतर्फे उबाठा गटाचे भास्कर मोकल यांना उमेदवारी दिली आहे. भास्कर मोकल यांच्यासोबत गावातील सर्व मातब्बर पुढारी असून प्रतिक गोंधळी यांच्यासोबत तरूणांची फौज आहे.

चिरनेर ग्रामपंचायतीच्या सरपंच आणि १५ सदस्यांसाठी ही निवडणूक होत असून या निवडणुकीत चार हजार ८०७ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मागील निवडणुकीत येथे कॉँग्रेस आघाडीचे संतोष चिर्लेकर यांनी भास्कर मोकल यांचा पराभव केला होता, मात्र आत्ता त्याच कॉँग्रेस-शेकाप आघाडीने ठाकरे गटासोबत आघाडी केली असून भास्कर मोकल यांना पाठिंबा दिला आहे. मागील पाच वर्षांत गावातील खराब झालेले रस्ते आणि रस्त्यांवरून वाहणारी गटारे यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे आणि त्यांच्यासोबतच आघाडी केल्यामुळे त्याचा फटका भास्कर मोकल यांना बसण्याची शक्यता आहे. दुसरीकडे भाजपने प्रतिक गोंधळी यांना सरपंचपदाच्या निवडणुकीत उभा केल्यामुळे नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहेत. राजकारणात नवखे असले तरी गावातील कौटूंबिक नाती आणि मित्रत्वाचे संबध ही प्रतिक गोंधळी यांची जमेची बाजू आहे.


प्रतिक गोंधळी यांच्या विजयासाठी स्थानिक तरूण आणि आमदार मेहेश बालदी, आमदार प्रशांत ठाकूर, उद्योजक पी. पी. खारपाटील, उद्योजक राजेंद्र खारपाटील हे उत्स्फूर्त प्रयत्न करीत आहेत. मी निवडून आल्यानंतर आमदार महेश बालदी यांच्या सहकार्याने ही कामे प्राधान्याने करणार, येथे येणाऱ्या प्रकल्पांमध्ये स्थानिक तरूणांना सामाऊन घेण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिक गोंधळी यांनी सांगितले.



# करंजाडेकरांना लवकरच मिळणार उद्यान

**पनवेल : प्रतिनिधी**

नवीन वर्षात करंजाडेकरांना चांगले उद्यान उपलब्ध होणार आहे. सिडकोने सेक्टर ३ मधील प्लॉट नंबर५८ मध्ये उद्यानाचा आराखडा मंजूर केला असून लवकरच त्याचे टेंडर काढले जाणार असल्याची माहिती सरपंच मंगेश शेलार यांनी दिली.





पनवेल महापालिका हद्दीजवळ असलेल्या व सिडकोने वसवलेल्या करंजाडे वसाहतीतील नागरिकांची उद्यान असावे, अशी अनेक दिवसाची मागणी होती. ग्रामपंचायत निवडणूकीत भाजपने सत्ता आल्यास उद्यानाचा प्रश्न सोडवण्याचे आश्वासन दिले होते. त्याप्रमाणे सरपंच मंगेश शेलार, भाजप शहर अध्यक्ष मिरेंद्र शहारे, भाजप करंजाडे विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार, उपसरपंच सागर आंग्रे ग्रामपंचायत सदस्य सुरज शेलार, भाजपचे पदाधिकारी बळीराम भोईर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्यामार्फत केललेल्या प्रयत्नांना यश आले असून सेक्टर ३, प्लॉट ५८मध्ये सात हजार ६०० पेक्षा जास्त स्केवर मिटरच्या भव्य उद्यानाच्या आराखड्याला सिडकोने मंजूरी दिली आहे.

सिडकोने सादर आराखडा मंजूर केला असून लवकरच्या त्याच्या टेंडर काढण्याच्या कामाला सुरुवात होणार असल्याची माहिती सरपंच मंगेश शेलार व भाजप शहर अध्यक्ष मिरेंद्र शहारे यांनी दिली. रस्ते, गार्डन, फुटपाथ, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, तलाव सुशोभीकरण इत्यादी अनेक गोष्टी मार्गी लावण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. लवकरच एक एक प्रश्न मार्गी लागेल असेही त्यांनी सांगितले.

**गार्डनमधील सुविधा :**

**१. ओपन जिम, २. झाडांच्या सभोवताली बसण्यासाठी घेर.**
**३. लहान मुलांना खेळण्यासाठी सॅन्ड पिट एरिया.**
**४. शोभिवंत वनस्पती सभोवताली बसण्यासाठी पायऱ्या.**
**५. गॅझेबो: जिथून बाहेरचे दृष्य बघता येईल, ६. स्टोन वॉकवे.**
**७. कॉर्नर परगोला, ८. लाकडी आयताकृती परगोला.**
**९. चालण्यासाठी पदरस्ता.**

**आम्ही ग्रामपंचायत निवडणुकीत जिंकून आल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून कामाला सुरुवात केली एक एक कामाचा पाठपुरावा सुरू केला आणि त्याचे रिजल्ट आता दिसायला सुरुवात झाली. जो विश्वास लोकांनी आमच्यावर ठेवला त्यास कधीही तडा जाऊ देणार नाही. दिलेली सर्व वचने आम्ही पूर्ण करू.**

**-मगेश शेलार, सरपंच**

# 'पनवेल टाइम्स'चा आज सन्मान पुरस्कार सोहळा

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथून प्रकाशित होणाऱ्या पनवेल टाइम्सच्या वर्धापन दिनानिमित्त पनवेल टाइम्स सन्मान पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. पनवेल टाइम्सच्या वर्धापन दिनानिमित्त पनवेलचे नाव उंचावणाऱ्या व्यक्ती आणि सेवाव्रती संस्थांना मान्यवरांच्या हस्ते पनवेल टाइम्स सन्मान पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

या सोहळ्यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी लेखक रामदास फुटाणे, आमदार रमेश पाटील, पनवेलचे माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, प्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे उपस्थित राहणार आहेत. मंगळवारी (दि. ३१) दुपारी ३.३० वाजता सुरूची हॉटेल, सुरूची बँक्वेट हॉल, पहिला मजला कोहिनूर टेक्निकल जवळ, पनवेल येथे हा सोहळा होणार आहे. या सन्मान पुरस्कार सोहळ्यानिमित्त निमंत्रित कवींच्या कवी संमेलनाचे दुपारी १.३० वाजता आयोजन करण्यात आले आहे.

या कवी संमेलनासाठी सुप्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे, कोकण मराठी साहित्य परिषदेचे जनसंपर्कप्रमुख प्रा. एल. बी. पाटील हे प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यासाठी पनवेलकरांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संपादक गणेश कोळी यांनी केले आहे.

# शिंपी समाजातील कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

**मुंबई : प्रतिनिधी**

अखिल भारतीय नामदेव क्षत्रिय महासंघांतर्गत येणाऱ्या महाराष्ट्रातील समस्त शिंपी समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत सोमवारी (दि. ३०) भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.



अहिर शिंपी समाजाचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष विजय नाना बिरारी, भावसार शिंपी समाजाचे अध्यक्ष महेंद्र पतंगे यांच्यासह शिंपी समाजातील अनेक कार्यकर्त्यांनी प्रवेश केला. भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात बावनकुळे यांनी या सर्व कार्यकर्त्यांचे पक्षात स्वागत केले. प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील हेही या वेळी उपस्थित होते. पक्षप्रवेशाची भूमिका मनोज भांडारकर यांनी विषद केली, तसेच प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांना समाजाचे नेते व अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांनी समाजाच्या विविध मागण्यांचे निवेदन दिले. याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी लवकरच भेट घेऊन मागण्यांबाबत चर्चा करू, असे आश्वासन प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी दिले.

ॲड. मीना केशव सोनोने, जळगाव जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते मयूर शिंपी, पुणे येथील मयूर हिरवे, जळगाव येथील अशोक शिंपी, सोलापूर येथील सिद्धार्थ बकरे, सोलापूर येथील मंगेश ढवळे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी भाजपामध्ये प्रवेश केला.

पान १ वरुन

## मराठा समाजाला न्यायालयात टिकणारे आरक्षण देण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न

मराठा आरक्षणावरून राज्यात जी काही आंदोलने व उपोषणे सुरू आहेत त्याकडे आम्ही अतिशय गांभीर्याने पाहत आहोत. सरकारला मराठा समाजाला न्यायालयात टिकणारे, कायद्याला, नियमाला धरून आरक्षण द्यायचे आहे. त्यामुळे यासाठी सर्व बाजूंचा अभ्यास करूनच निर्णय घ्यावा लागणार आहे. समाजाला त्यांच्या हक्काचे आरक्षण दिले जाईल. हे आरक्षण देत असताना इतर घटकांवर अन्याय होणार नाही. यापूर्वी दिलेले आरक्षण न्यायालयात टिकू शकले नाही, असे पुन्हा घडू नये यासाठी काळजीपूर्वक पावले टाकावी लागणार आहेत. यामुळे आंदोलकांनीदेखील सरकारची भूमिका समजून घेत सहकार्य करावे. मराठा समाजबांधवांनी टोकाचे पाऊल उचलू नये. मनोज जरांगे-पाटील यांच्या प्रकृतीची आम्हाला काळजी आहे. त्यांनी वैद्यकीय उपचार घ्यावेत, पाणी प्यावे. आंदोलकांनी शांततेचा मार्ग सोडू नये, असे आवाहनही मुख्यमंत्री शिंदे यांनी केले.

# सेंट जोसेफ स्कूलविरोधात सय्यद अकबर यांची तक्रार

## विद्यार्थिनीला अयोग्य वागणूक दिल्याने आक्रमक

**पनवेल : वार्ताहर**

रायन इंटरनॅशनल संचलित सेंट जोसेफ सीबीएससी हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेजमध्ये सानिया अकबर सय्यद या बारावी सायन्सच्या विद्यार्थिनीला गंभीर स्वरूपाची जखम झाली. त्यानंतर तिचे वडील व भाजप अल्पसंख्याक सेलचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तथा कोकण डायरीचे संपादक सय्यद अकबर यांनी त्वरित महाविद्यालयात धाव घेतली व या शिक्षण संस्थेच्या क्रियाशीलतेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्याचप्रमाणे त्यांनी याबाबत पनवेल पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी आणि खांदेश्वर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक यांनादेखील अवगत केले आहे.

याबाबत सय्यद अकबर यांनी दिलेल्या माहितीनुसार रायन इंटरनॅशनल संचलित सेंट जोसेफ सीबीएससी हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये शिकणारी त्यांची मुलगी सानिया अकबर सय्यद विद्यार्थिनीला शारीरिक शिक्षण प्रकाराचा फारसा अनुभव नसलेल्या एका शिक्षिकेने फरशीवर रनिंग करण्यास भाग पाडले. विद्यार्थिनीच्या अस्थमा (दमा) या व्याधीची मुख्याध्यापकांना व संबंधित शिक्षकांना यापूर्वी कल्पना दिलेली होती. स्वतः विद्यार्थिनी मी अस्थमा पेशंट असून दमछाक होणाऱ्या ॲक्टिव्हिटीज करीत नाही, असे वारंवार समजावून सांगत होती. तिचे कुठलेही न ऐकता धावण्याचा सराव शिक्षकाने सुरूच ठेवला. शिट्ट्यांवर शिट्या मारत तिला धावण्यास भाग पाडले. फरशीवर धावत असताना ही विद्यार्थिनी पडली व तिच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. हातापायाला व कमरेलाही प्रचंड मार लागला आहे.

मुलीच्या अपघाताबाबत समजल्यानंतर मी त्वरित महाविद्यालयात धाव घेतली. अस्थमा असूनदेखील आमच्या मुलीला धावण्यास का सांगितले? भले मोठे मैदान असूनदेखील फरशीवर का धावण्याचा सराव करता? असे प्रश्न विचारल्यानंतर शिक्षकांनी हसत त्यांना टाळण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर मी स्वतः मुलीला खांदा कॉलनीतील वीर हॉस्पिटलमध्ये नेऊन उपचार केले, असे सय्यद अकबर म्हणाले.



मुलीने तिला अस्थमा असल्यामुळे पाचव्या मजल्यावरील वर्गात जाण्यासाठी लिफ्टचा वापर करावा या स्वरूपाच्या परवानग्या तिच्या वडिलांनी मुख्याध्यापक व संबंधित शिक्षकांकडून घेतल्या आहेत. असे असले तरी वरचेवर तिला शिक्षकांकडून लिफ्टचा वापर करण्यास प्रतिबंध करण्यात येतो. अशा वेळी तिने स्वतःहून अस्थमा असल्याचे सांगितले. तरीदेखील शिक्षक तिला जिन्याने वर पाठवतात, असाही अकबर यांचा आरोप आहे.

या वेळी येथे उपस्थित पालक वर्गापैकी एका व्यक्तीने शाळा प्रशासनाला जाब विचारताना व त्यांना खडसावताना खारघर येथे जाऊन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या इंटरनॅशनल स्कूलमध्ये असणाऱ्या अपघात व आपत्कालीन व्यवस्थेबद्दल तिथे जाऊन ते व्यवस्थापन शिकून येण्याचा सल्ला दिला. त्यांच्या म्हणण्यानुसार, पनवेल परिसरामध्ये त्या शाळेत आपत्कालीन व्यवस्थापन जितके नियोजनपूर्ण आहे तितके अन्य कुठल्याही शाळेत नाही.

# चिरनेरमध्ये भाजप बाजी मारणार

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी येत्या पाच नोव्हेंबरला मतदान होणार असून, येथे राजकीय हालचाली व प्रचाराला वेग आला आहे, मात्र ही ग्रामपंचायतची निवडणूक जिंकून भाजप बाजी मारणार, असा विश्वास भाजपचे ज्येष्ठ नेते राजेंद्र खारपाटील यांनी व्यक्त केला.



## ज्येष्ठ नेते, कार्यकर्त्यांनी व्यक्त केला विश्वास

यासोबतच चिरनेर ग्रामपंचायत भाजपकडे येणार असल्याचे मत भाजपचे अनुभवी कार्यकर्ते समीर खारपाटील, सागर खारपाटील, करण पाटील, प्रकाश गोंधळी, संजय गोंधळी, संताजी गोंधळी, सुशांत पाटील, स्वप्निल पाटील, माजी उपसरपंच प्रियांका पाटील, संदीप गोंधळी, अनिकेत गोंधळी, सुजित पाटील स्वप्निल खारपाटील, नमस्ते मोकल, योगेश खारपाटील, जयेश खारपाटील तसेच भाजपचे अन्य कार्यकर्ते व्यक्त करीत आहेत.

चिरनेर गावाची एकूण नऊ हजार ५०० इतकी लोकसंख्या असलेल्या चिरनेर ग्रामपंचायतीच्या निवडणुकीच्या पाच प्रभागात चार हजार ८४० मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. त्यामुळे या निवडणुकीत भाजपचे कार्यकर्ते जोरात काम करताना दिसत आहेत. या वेळी भाजपचे थेट सरपंचपदाचे उमेदवार प्रतीक गोंधळी यांच्याशी प्रचारादरम्यान संपर्क साधला असता, त्यांनी ग्रामपंचायतीवर भारतीय जनता पक्षाची सत्ता आल्यावर अनेक विकास कामांची पूर्तता आणि विविध नाविन्यपूर्ण योजना राबवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी बोलून दाखविले.

या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीच्या पाच प्रभागात कार्यकर्ते पूर्णपणे चाचपणी करून, उमेदवारांना भरघोस मतांनी निवडून आणण्यासाठी एक दिलाने व जोमाने कामाला लागले असल्याचे चित्र सध्या पहायला मिळत आहे. उमेदवार रमेश फोफेरकर, सुशील पाटील, रमेश गोंधळी, प्रणोती पाटील, वनश्री खारपाटील, सरिता खारपाटील, मेघा चिर्लेकर, अश्विनी नारंगीकर, अश्विनी कातकरी, सिताराम कातकरी समीर डुंगीकर, अंकित म्हात्रे, अजिंक्य ठाकूर, हे सर्वजण निवडणुकीच्या रिंगणात असून, प्रचारात त्यांना जनतेचा कौल मिळत असून, त्यांच्यात उत्साह संचारला आहे.

**चिरनेर ग्रामपंचायतची निवडणूक भाजप स्वतंत्रपणे लढवीत असून,जनतेचे मूलभूत प्रश्न व समस्या सोडवण्याची जबाबदारी घेत, भाजप खऱ्या अर्थाने विकास कामांना चालना देत राहील.**
**-पी. पी. खारपाटील, ज्येष्ठ नेते भाजप, उद्योगपती**

**आम्ही विकास कामांचा आव आणणार नाही, तर विकासाची कामे प्रत्यक्षात करून दाखवू.**
**-राजेंद्र खारपाटील, भाजप नेते व उद्योगपती**

# न्हावे येथे उत्कर्ष ग्रामविकास मंडळाची रॅली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यामध्ये ग्रामपंचायत निवडणुकांची धामधुम सुरू आहे. त्या अंतर्गत न्हावे ग्रामपंचायतीमधील प्रचार अंतिम टप्प्यात आला आहे. त्यानुसार भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि काँग्रेसप्रणित उत्कर्ष ग्रामविकास मंडळ न्हावे-न्हावेखाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ रविवारी (दि. २९) प्रचार रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

या निवडणुकीमध्ये थेट सरपंचपदासाठी विरेंद्र पाटील, तर सदस्यपदासाठी प्रभाग क्रमांक १मधून शैलेश पाटील, जॉर्ज मिनिजेस, अक्षदा भोईर; प्रभाग क्रमांक २मधून राजेश म्हात्रे, रंजना पाटील, सुनिता भोईर; प्रभाग क्रमांक ३मधून सविता ठाकूर, जागृती भोईर; प्रभाग क्रमांक ४मधून सागर ठाकूर, नरेश मोकल, ललिता ठाकूर उभे आहेत. यांच्या प्रचारासाठी न्हावे परिसरात रविवारी प्रचार रॅली काढण्यात आली. या वेळी मतदारांपर्यत्त पोहचून उत्कर्ष ग्रामविकास मंडळ न्हावे-न्हावेखाडीच्या उमेदवारांच्या उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन करण्यात आले.

या वेळी भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, माजी सरपंच हरेश्वर म्हात्रे, म्हसेश्वर मंदिर कमिटी अध्यक्ष सी. एल. ठाकूर, सागर ठाकूव, चंद्रकांत भोईर, माजी उपसरपंच किरण पाटील, जे. बी. म्हात्रे, किशोर भोई, दिपक भोईर, राजेश म्हात्रे, शैलेश पाटील, नितीन भोईर, तुषार भोईर, दीपक भोईर, चंद्रकात पाटील, मिनाक्षी पाटील, रंजना घरत, वासंती भोईर, शोभा भोईर, जागृती म्हात्रे, सविता ठाकूर, संदीप म्हात्रे, केतन बेंद्रे, रंजना पाटील आदी उपस्थित होते.






# दिघोडेमध्ये विकासकामांना प्राधान्य

## महायुतीचे मयूर घरत यांची ग्वाही

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील दिघोडे ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूक पार्श्वभूमीवर भाजप, शिवसेना, शेकाप, मनसे व राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे अधिकृत उमेदवार मयूर घरत यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. त्यांच्या अर्धांगिनी सोनिया मयूर घरत यांच्या मागील पाच वर्षाच्या सरपंचपदाच्या कार्यकाळात दिघोडे ग्रामपंचायत हद्दीतील विकास कामांना अधिकाधिक प्राधान्य दिले असून, महायुतीला पुन्हा एकदा सत्तेत येण्याची संधी प्राप्त होण्याचे संकेत मिळत आहेत.



दिघोडे ग्रामपंचायतीच्या थेट सरपंचासह एकूण ११ सदस्यांच्या निवडीसाठी ५ नोव्हेंबर २०२३ रोजी निवडणूक होत आहे. दिघोडे येथे भाजप, शिवसेना, शेकाप, मनसे व राष्ट्रवादी काँग्रेस महायुती समोर काँग्रेस-शेकाप आघाडी अशी लढत होत आहे. या निवडणुकीसाठी महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी प्रचारात आघाडी घेतली असून या थेट सरपंच पदाच्या व सदस्यांच्या निवडणुकीत गावातील नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या आणि विकासाचे मुद्दे घेऊन निवडणूक लढवित आहोत.

गावातील रस्ते, नाले, गटारे, स्वच्छता गृह आणि गरीब गरजू नागरिकांना घरकुल योजनेतून राहण्यासाठी सुसज्ज घरांचा लाभ देणे, व शासनाच्या अखत्यारीत येणाऱ्या केंद्र व राज्य सरकारच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या व जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत मार्फत करण्यात येणाऱ्या विकास कामांना अग्रक्रमाणे वाव देण्याचा आमचा मानस असल्याचे महायुतीचे थेट सरपंच पदाचे उमेदवार मयूर घरत यांनी सांगितले.

# सोमटणेमध्ये ग्रामविकास आघाडीचा प्रचार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यामध्ये ग्रामपंचायत निवडणुकांची धामधुम सुरू आहे. त्याअंतर्गत सोमटणे ग्रुपग्रामपंचायतीमध्ये भाजप, शिवसेना आणि काँग्रेस प्रणित ग्रामविकास आघाडीने ग्रामपंचायत निवडणुक या प्रचारात आघाडी घेतली आहे.



या निवडणुकीमध्ये थेट सरपंचपदासाठी तेजस्वीनी पाटील तर सदस्यपदासाठी प्रभाग क्रमांक १ मधून दिपा पाटील, मयूरी पवार, नरेंद्र म्हस्कर प्रभाग क्रमांक २ मधून भाविका बैकर, सुवर्णा कांबळे, विशाल पाटील तर प्रभाग क्रमांक ३ मधून अविनाश मुंढे, रजनी मुंढे, आंबो मुंढे रिंगणात आहे. या सर्व उमेदवारांची प्रचार रॅली काढण्यात आली तसेच मतदारांपर्यत्त पोहचून विजयी करण्याचे आवाहन करण्यात आले.

या वेळी पुंडलिक दिघे, मारुती पाटील, दत्तात्रेय पाटील, यशवंत गायकर, कृष्णा मोरे, धनंजय पाटील, रमेश पाटील, नितीन तांडेल, विनायक पाटील, महेश मुंढे, रघुनाथ दिघे, लक्ष्मण बैकर, लक्ष्मण कांबळे, रवी पाटील, महेंद्र कांबळे, जीवन मुंढे, रामा मुंढे, मंगेश पोपेटा, चेतन पोपेटा, जयंद्र मुंडे, प्रसाद भोपी, महेश बैकर, महेंद्र बैकर, गंगाराम पाटील, रमेश पाटील यांच्यासह सोमटणे, दहिवली, नारपोली येथील पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्थानिक टॅक्सीचालकांवरील अन्याय दूर करा

## भाजपप्रणित कामगार संघटनेची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बाहेरून येणारे रिक्षा चालक स्थानिक टॅक्सीचालकांवर करत असलेल्या अन्याय आणि दमदाटीवर येत्या सात दिवसांत कडक कारवाई करावी; अन्यथा मोर्चा काढू असा इशारा भाजप प्रणित वंदे मातरम जनरल कामगार संघटनेने तसेच रायगड जिल्हा विक्रम मिनीडोर संघाचे जिल्हाध्यक्ष विजयभाऊ पाटील यांनी सोमवारी (दि. ३०) दिला आहे.



पनवेल परिसरातील खांदा कॉलनी, कळंबोली, नावडे गाव पाणी टाकी, तोंडरे फाटा या ठिकाणी बाहेरून येणारे रिक्षाचालकांची खूप दादागिरी वाढली असून त्यामुळे स्थानिक टॅक्सचालकांवर अन्याय होत आहे. हे रिक्षाचालक प्रवाश्यांना स्थानिकांच्या गाडीमध्ये बसू देत नाहीत तसेच पनवेल ते आय.जी.पी.एल. स्टॅण्ड अधिकृत मेन रोडला छोट्या रिक्षाचे अनधिकृत स्टॅण्ड झाले आहेत. त्यामुळे स्थानिक टॅक्सीचालकांवर उपासमारी वेळ आली आहे. टॅक्सी चालकांच्या या समस्येसंदर्भात भाजप प्रणीत वंदे मातरम जनरल कामगार संघटनेचे उपाध्यक्ष रवी नाईक आणि विक्रम मिनीडोर संघाचे जिल्हाध्यक्ष विजयभाऊ पाटील यांनी सोमवारी आरटीओ कार्यालयात भेट देऊन सहाय्यक परिवहन अधिकारी गजानन ठोंबरे यांच्याशी समस्येबाबत सविस्तर चर्चा करून टॅक्सी चालकांच्या समस्या या वेळी मांडल्या.

बाहेरून येणाऱ्या एमएच०४, एमएच-०१, एमएच-०३, एमएच-०२, एमएच-०५ आणि एमएच-४३ या पासींगच्या गाड्यांवर येत्या ७ दिवसांत कारवाई करावी अन्यथा तीव्र आंदोलन करू, असा इशारा निवेदनाद्वारे दिला. या वेळी विक्रम मिनीडोर संघाचे जिल्हाध्यक्ष विजय पाटील, वंदे मातरम जनरल कामगार संघटनेचे उपाध्यक्ष रवी नाईक, उपाध्यक्ष दीपक नावडेकर, जिल्हा प्रतिनिधी राजू भंडारी, पनवेल अध्यक्ष शाम भगत, रायगड प्रतिनिधी शंकर पाटील, पनवेल उपाध्यक्ष संतोष पाटील, दहिसर अध्यक्ष हेमंत म्हात्रे, दहिसर उपाध्यक्ष मयूर पाटील, गजानन भागवत, संतोष म्हात्रे, मच्छींद्र पाटील यांच्यासह स्थानिक टॅक्सीचालक उपस्थित होते.





**पनवेल : भाजप पनवेल शहर मंडल उपाध्यक्षपदी प्रीतम म्हात्रे यांची आणि चिटणीसपदी रूपेश नागवेकर यांची नियुक्ती झाली आहे. याबद्दल त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सोमवारी भेट घेऊन आशीर्वाद घेतले. या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, शहर अध्यक्ष अनिल भगत, युवा मोर्चाचे शहराध्यक्ष सुमित झुंझारराव आदी उपस्थित होते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.**

# कळंबुसरे ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचाराविरोधात आंदोलन

**उरण : रामप्रहर वृत्त**

कळंबुसरे ग्रामपंचायतीमधील भ्रष्टाचाराला चाप बसावा याकरिता ग्रामपंचायत सदस्य सोमवार (दि. ३०)पासून बेलापूरमधील कोकण आयुक्त कार्यालयासमोर कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलनाला बसले आहेत.




उरण तालुक्यातील कळंबुसरे ग्रामपंचायतमध्ये ग्रामनिधी आणि लहान मूलांची दफनभूमी साफसफाई संदर्भात प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबधित ग्रामसेवक तसेच सरपंचावर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य नितीन पांडुरंग केणी, सविता मनोहर नाईक, अश्विनी नाईक, स्वप्नाली पाटील यांनी कोकण आयुक्त, रायगड जिल्हाधिकारी, उरण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, पंचायत समिती उरण,मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद, नवी मुंबई पोलीस आयुक्तालय बेलापूर आदी ठिकाणी पत्रव्यवहार करून केली होती.

शांततेच्या आणि कायदेशीर मार्गाने पत्रव्यवहार करूनसुद्धा कळंबुसरे ग्रामपंचायतीमधील भ्रष्टाचाराला चाप बसत नसल्याने तसेच संबधित भ्रष्टाचारप्रकरणी सरपंच तसेच ग्रामसेवकावर कोणतेही कायदेशीर कारवाई होत नव्हती. त्यामुळे कळंबुसरे ग्रामपंचायतीचे सदस्य नितीन पांडुरंग केणी, सविता मनोहर नाईक, अश्विनी तळीराम नाईक, स्वप्नाली महेश पाटील हे सोमवार पासून बेलापूर मधील कोकण आयुक्त कार्यालयासमोर कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलनाला बसले आहेत.

या वेळी कळंबुसरे ग्रामपंचायतीचे सदस्य नितीन केणी यांनी शासनाकडून आम्हाला न्यान मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

राम प्रहर
वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा

# गृहनिर्माण सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सहकार भारती पनवेल महानगर जिल्हा, पनवेल, महानगर जिल्हा फेडरेशन, पनवेल, सरस्वती हाऊसिंग फेडरेशन, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमान सिद्धांत मार्केट को-ऑप हौ सोसायटी लि. पनवेलचे चेअरमन रवींद्र गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त सहकारी गृहनिर्माण सोसायटीच्या पदाधिकारी आणि सभासदांसाठी मार्गदर्शन शिबिर रविवारी (दि. २९) झाले.



या शिबिराचे उद्घाटन पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन व संचालन प्रवीण बुलाख, प्रमोद जोशी, त्रिवेणी सालकर, मनिषा म्हात्रे-निमसे, अपूर्णा नाडगंडी, संतोष मिसाळ, ॲड. अरुण कुंभार, उदय शंकर, संजय झुनझुनवाला, ॲड. गणपत राठोड आदी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पियुष जोशी, करंजाडेचे सरपंच मंगेश शेलार, नामदेव पाटील, राजेंद्र जगे, डॉ. मुनीर सय्यद, सतीश पंडीती, विकास गायकवाड, अनिल शिंदे, विजयदादा, गणेश झेमसे, विकास भुजबळ, संजय गवळी, मनिष गीध, रमेश कलींग, प्रशांत जगे, केतन भोपतराव आदींनी मेहनत घेतली.

## संपादकीय

# हिंसेला अटकाव हवा

केरळमध्ये स्फोट झाल्याची बातमी रविवारी सकाळी अकस्मात येताच दक्षिणेत हिंसक कारवायांनी डोके वर काढल्याबद्दलची चिंता स्वाभाविकपणे सुजाण नागरिकांच्या मनात निर्माण झाली असावी. प्रत्यक्षात मात्र या स्फोट प्रकरणातील तपशील काहिसे निराळेच निघाले. अर्थात तरीही चिंता वाटण्यासारख्या काही बाबी आहेतच.

**केरळमधील कोचिनजीकच्या कलमस्सेरी येथे रविवारी सकाळी ख्रिस्ती समाजातील एका पंथाच्या धार्मिक परिषदस्थळी दोन-तीन बॉम्बस्फोट झाले. 'जेहोव्हाज विटनेसेस' या ख्रिस्ती अल्पसंख्याक गटाच्या परिषदेच्या ठिकाणी हे स्फोट झाले. यात दोन महिलांचा मृत्यू झाला तर ५१ जण जखमी झाले. यातील सहा जणांची प्रकृती चिंताजनक आहे. हल्ल्यानंतर काही तासांतच एक जण हल्ल्याची जबाबदारी स्वीकारून पोलिसांना शरण आला. या इसमानेही आपण 'जेहोव्हाज विटनेसेस' याच ख्रिस्ती गटाचे सदस्य असल्याचा दावा केला, परंतु गटातील अन्य कुणीतरी त्याचा हा दावा फेटाळला आहे. अधिकृतरित्या या गटाकडून कुठलीही प्रतिक्रिया आलेली नाही. ख्रिश्चन धर्मातील 'जेहोव्हाज विटनेसेस' या अल्पसंख्याक गटाची तीन दिवसांची परिषद कलमस्सेरीतील एका सभागृहात सुरू होती. कार्यक्रमाचा समारोप सुरू असताना हे स्फोट झाले. स्फोट घडवण्यासाठी 'आयईडी'चा वापर झाल्याचे पोलिसांकडून प्राथमिक तपासानंतर सांगण्यात आले. 'जेहोव्हाज विटनेसेस'मध्ये काही गैरप्रकार चालत असल्यामुळे आपण हे कृत्य केल्याचा दावा बॉम्बस्फोटाची जबाबदारी घेणाऱ्या डॉमिनिक मार्टिन या व्यक्तीने केला आहे. जेहोवाज विटनेसेस या ख्रिस्ती धर्मातीलच एक पंथ असलेल्या गटाची पार्श्वभूमी जाणून घ्यायची झाल्यास, १९व्या शतकात अमेरिकेतील काही ख्रिस्ती लोकांनी बायबलचा वेगळा अर्थ लावणे सुरू करत आपला वेगळा पंथ स्थापन केला. ठळक मतभिन्नता पाहायची झाल्यास, हा पंथ ख्रिस्ती धर्मातील 'होली ट्रिनिटी' म्हणजे पवित्र त्रिमूर्तीची संकल्पना मानत नाही. ख्रिस्ती धर्माशी तुलना करता हा पंथ फारच अलीकडच्या काळात स्थापन झालेला आहे. आजमितीस जेहोव्हाज विटनेसेसचे जगभरात अवघे ८५ लाख अनुयायी आहेत. ही संख्या लक्षात घेता ख्रिस्ती धर्मियांमध्ये या पंथाच्या लोकांची संख्या तुलनेने किती अल्प आहे हे लक्षात येते. बायबलचा अर्थ लावण्यावरून आणि सदस्यांना मिळालेल्या वागणुकीवरून या पंथावर यापूर्वीही टीका झालेली आहे. यापूर्वी जर्मनीच्या हॅम्बर्ग शहरात याच पंथाच्या परिषदेमध्ये असाच हल्ला झाला होता आणि संबंधित हल्लेखोर हाही पंथाचा माजी सदस्य होता. त्याने बेछूट गोळीबार करून सहा जणांचे बळी घेतले होते. अखेरीस हातातील पिस्तुलाने त्याने स्वत:चाही अंत करून घेतला. या पंथाच्या अनुयायांना इतके टोकाचे हिंसक पाऊल का उचलावेसे वाटले यावर आता विचार होण्याची गरज आहे. आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे एका सर्वसामान्य व्यक्तीला स्फोट घडविण्याकरिता आयइडीसारखे स्फोटक उपलब्ध कसे झाले याची चौकशी होण्याची गरज आहे. केरळ हे राज्य निसर्गरम्यतेसाठी व साक्षरतेसाठी देशभरात प्रसिद्ध असले तरी तेथील राजकारणाला नेहमीच हिंसक वळण लागत आले आहे. केरळची जवळपास निम्मी लोकसंख्या ही मुस्लिम आणि ख्रिश्चन धर्मीय आहे. रविवारी स्फोट घडताच समाजमाध्यमांवर त्याचा संबंध इस्रायल-हमास संघर्षाशी जोडला गेलेला मोठ्या प्रमाणात आढळून आला. अखेरीस तेथील राज्य सरकारला अफवा न पसरवण्याचे आवाहन करावे लागले. आगामी काळ हा निवडणुकांचा असल्याने केरळमधीलच नव्हे तर सर्वच राज्यांतील सरकारांनी कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या बाबतीत अधिक दक्ष असायला हवे आहे.**

# ग्रामपंचायत हद्दीतील अनेक इमारती धोकादायक



खबरबात
महेश शिंदे

शहरातील धोकादायक इमारतींचा प्रश्न ऐन पावसाळ्यात नेहमी ऐरणीवर येतो, मात्र ग्रामपंचायत क्षेत्रात असलेल्या अनेक इमारती धोकादायक असूनदेखील त्यांच्याकडे ग्रामपंचायत प्रशासन आणि जिल्हा प्रशासनाचेदेखील दुर्लक्ष असल्याने नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट होणे आवश्यक आहे, असे मत नागरिक व्यक्त करत आहेत.

गेली काही वर्षात ऐन पावसाळ्यात विविध ठिकाणी इमारती कोसळून अपघात झाल्याच्या घटना घडल्या आहेत. यामध्ये शेकडो जीव गेले आहेत. इमारत बांधकाम करणारे व्यवसायिकांच्या बेजबाबदारपणामुळे निकृष्ट कामांचा फटका नागरिकांना बसत आहे. त्यातच पालिका, जिल्हा प्रशासनआणि इमारत आरेखक अशा कामांकडे दुर्लक्ष करत असल्याने या घटना वारंवार होत असल्याचे दिसून येत आहे. महाडमध्ये सन २०२० मध्ये तारिक गार्डन हि इमारत पत्त्यांप्रमाणे कोसळली आणि संपूर्ण जिल्हा हादरून गेला. त्यानंतर महाड शहर पालिका परिसरातील धोकादायक इमारतींचा प्रश्न ऐरणीवर आला. धोकादायक तसेच जुन्या इमारतींचा तपास सुरू झाला. यामध्ये ५० हून अधिक इमारती धोकादायक स्थितीत आढळून आल्या. शहरातील इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट झाले. अवघ्या दहा वर्षांतील इमारतीदेखील निकृष्ट कामामुळे कमकुवत झाल्याचे आढळून आले. यामुळे या इमारती पाडून नव्याने उभ्या करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शहरातील इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट झाले असले तरी ग्रामपंचायत क्षेत्रात असलेल्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट झालेले नाही. अनेक इमारती आजही धोकादायक स्थतीत आहेत. महाड शहरालगत असलेल्या साहिलनगर (गांधारपाले), बिरवाडी, चांभारखिंड, नडगाव, या गावांतील जुन्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट होणे आवश्यक आहे. बिरवाडी, साहिलनगर मधील अनेक इमारती उभ्या करताना नियमांचे पालन झालेले नाही. शिवाय इमारतीमध्ये रहिवास सुरू झाल्यानंतर या इमारतींच्या देखभाल दुरुस्तीकडे देखील इमारतीमधील रहिवाशी दुर्लक्ष करत असल्याने या इमारती अल्पावधीतच कमकुवत होत आहेत. ग्रामपंचायत क्षेत्रात दिले जाणारे बांधकाम परवाने हे बिनशेतीच्या माध्यमातून दिले जात असल्याने इमारत नियमात होत आहे का याकडे कोणाचेच लक्ष नसते. ग्रामपंचायत प्रशासनाकडे इमारत बांधकाम परवाना देण्याचा अधिकार अथवा तांत्रिकदृष्ट्या व्यक्ती नसल्याने बांधकाम कसे होत आहे हे कोणीच पाहत नाही. इमारत बांधकाम परवाना मिळाल्यानंतर इमारत लवकर उभी करण्याकडे विकासकाचा कल असतो. तर रूमचा ताबा लवकर मिळावा, अशी ग्राहकाची अपेक्षा असते.

ग्रामपंचायतीला बांधकाम परवाना प्रत मिळाली पाहिजे ज्या ग्रामपंचायत क्षेत्रात जिल्हा प्रशासन, नगर विकास बांधकाम परवाना देते तेथून एक प्रत ग्रामपंचायतिला मिळणे अपेक्षित आहे. शिवाय परवाना देण्यापूर्वी ग्रामपंचायत कार्यालयाकडून स्थानिक भौगोलिक स्थिती, तेथील पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, आदीची माहिती घेणे आवश्यक आहे. ग्रामपंचायत प्रशासनाला याबाबत अधिकार दिल्यास होणाऱ्या कामांवर वचक राहून कामे गुणवत्तापूर्ण होतील अशी अपेक्षा ग्रामीण भागातून व्यक्त होत आहे.

औद्योगिक क्षेत्रातदेखील धोकादायक इमारती औद्योगिक क्षेत्रात देखील अनेक कारखान्यांच्या इमारती धोकादायक स्थतीत आहेत. महाड औद्योगिक विकास महामंडळाच्या दुर्लक्षामुळे या कारखान्यांतून कामगार जीव मुठीत घेवून काम करत आहेत. कारखाना निरीक्षक औद्योगिक क्षेत्रात नियमाप्रमाणे भेट देवून निघून जातात, मात्र कामगार सुरक्षेवर लक्ष देणे गरजेचे आहे. धोकादायक इमारतीमध्ये काम करणाऱ्या कामगारांचा विमा काढला जातो का? कंत्राटी कामगारांना भविष्य निर्वाह निधी दिला जातो का याची चौकशी होणे गरजेचे आहे.

# लेखिका, बालसाहित्यिका आनंदीबाई शिर्के

'सांजवात' या आत्मचरित्रामुळे मराठी साहित्यात मानाचे स्थान मिळवणाऱ्या आनंदीबाई शिर्के या शंभर वर्षांपूर्वीच्या काळातील एक मान्यवर लेखिका होत. ज्या काळात स्त्री-शिक्षणालाच समाजाचा मोठ्या प्रमाणात विरोध होता, त्या काळात खानदानी मराठा कुटुंबातील या स्त्रीने आपली सुधारक मते ठामपणे मांडली आणि दृढपणाने ती अमलातही आणली.


आनंदीबाई म्हणजे पूर्वा-श्रमीच्या अनसूया गोविंदराव शिंदे. त्यांचा जन्म मुंबईतील चिंचपोकळी येथे झाला. त्यांचे मूळ गाव होते पुणे जिल्ह्यातील मंचर तालुक्यातील रांजणी, पण आजोबा व्यापारानिमित्त चिंचपोकळीला स्थायिक झाले होते. त्या काळच्या प्रथेप्रमाणे त्यांचा बालविवाह झाला नव्हता. वयाच्या अठराव्या वर्षापासून त्या लेखन करू लागल्या होत्या. 'मराठा मित्र'मध्ये त्यांची 'बेगम आरा' ही कथा प्रकाशित झाली, त्या वेळी 'मराठा मित्र'चे सहसंपादक शिवराम शिर्के यांच्याशी त्यांचा परिचय झाला. त्यातूनच दोघांचा पत्रव्यवहार व नंतर स्नेह वाढला. दोघांचा विवाह होण्यात दोन्ही पक्षांचा विरोध होता, तसेच कोकणातले खानदानी शिर्के व देशावरील शिंदे यांच्यातील विवाहाला तत्कालीन मराठा समाजातूनही फार मोठा विरोध झाला. अखेरीस, १८ डिसेंबर १९१३ रोजी, वयाच्या एकविसाव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. विवाहानंतर काही वर्षे त्यांचे वास्तव्य जळगाव व नंतर पुणे येथे होते.



आनंदीबाईंचे वडील बडोद्याला गायकवाड सरकारच्या सेवेत नोकरी करीत असल्यामुळे आनंदीबाईंचे बालपण गुजरातमधील नवसारी, पाद्रा, बडोदा, मेहसाणा येथे गेले. तेथील विविध गुजराती शाळांमधून त्यांचे शिक्षण झाले. परंतु, कौटुंबिक अडचणींमुळे शिक्षणात खंड पडला. त्यांनी नर्सिंगचे शिक्षण घेतले; पण त्यालाही घरातून विरोध होता. त्याच काळात लेखनाची आवड उत्पन्न होऊन त्यांनी 'कुमारी आनंदी' या नावाने कथालेखन सुरू केले.

पुणे येथे आकाशवाणीवर अनेक प्रसंगी, अनेक विषयांवरील त्यांची भाषणे गाजली. अत्यंत विचारी, संयमी, कष्टाळू, प्रगल्भ, चिंतनशील अशा आनंदीबाईंची लेखनशैली अतिशय प्रसन्न व मधुर होती. मराठी साहित्य परिषदेच्या वर्धापन दिनानिमित्त दरवर्षी उत्तम कथासंग्रहासाठी 'आनंदीबाई शिर्के' पारितोषिक दिले जाते. त्या निमित्ताने गतशतकातील या महत्त्वपूर्ण लेखिकेचे स्मरण महाराष्ट्रात केले जाते.

**-सविता टांकसाळे**



## बदलते तंत्रज्ञान

# पूर, भूकंप आणि वादळातही मिळणार हाय स्पीड इंटरनेट




रिलायन्स जिओने एक नवीन आपत्कालीन कम्युनिकेशन सिस्टीम लाँचे केली आहे. दिल्लीतील प्रगती मैदानावर आयोजित मोबाईल इंडिया काँग्रेसमध्ये हे प्रदर्शित करण्यात आले आहे. आपल्याकडे पूर, आग, वादळ, भूकंप यांसारख्या नैसर्गिक आपत्तींच्या वेळी मोबाईल, ब्रॉडबँड यांसारखे कनेक्शन बंद होतात, पण या समस्येला तोंड देण्यासाठी आपत्कालीन संपर्क यंत्रणा सुरू करण्यात आली आहे, जेणेकरून नैसर्गिक आपत्तींच्या वेळी उच्च संपर्क सेवा पुरवता येईल. स्पीड इंटरनेट उपलब्ध राहिल, ज्यामुळे दुर्गम भागात मदत करणे सोपे होईल. तसेच, त्या भागात संपर्क साधणे सोपे होईल.

इमर्जन्सी रिस्पॉन्स कम्युनिकेशन सिस्टम जिओच्या खऱ्या ५G नेटवर्कवर चालेल. यामुळे स्थानिक दळणवळण मजबूत होईल. स्थानिक दळणवळण प्रणालीमध्ये बिघाड झाल्यास, या प्रणालीमध्ये उपग्रह कनेक्टिव्हिटीसह 'कम्युनिकेशन टॉवर ऑन व्हील्स' सेटअप स्थापित करावा लागेल, जो कोणत्याही परिस्थितीत सुरू केला जाऊ शकतो.

Reliance Jio ने XR Companion नावाचे शक्तिशाली ॲप डिझाइन केले आहे. हे ॲप तुम्हाला तुमच्या सपोर्ट टीमशी रिअल टाइममध्ये कनेक्ट ठेवेल. कमांड सेंटरमधील ॲपद्वारे कामाचे वितरण, टू-वे ऑडिओ व्हिडिओ कॉलिंग, इमर्जन्सी ॲम्ब्युलन्स कॉलिंग, टीम मूव्हमेंट, कामाच्या प्रगतीचा अहवाल रीअल टाईम मॉनिटर केला जाऊ शकतो. सध्या या ॲपमध्ये जवळपास २० टीम्स एकाच वेळी जोडल्या जाऊ शकतात. जी गरज पडल्यास वाढवताही येते.

जिओच्या या नवीन कम्युनिकेशन सिस्टीममध्ये एनडीआरएफ किंवा दूरवर बसलेले मदत अधिकारी ५जी कनेक्टेड ड्रोनद्वारे दुर्गम ठिकाणी झालेल्या नुकसानीचा आढावा घेऊ शकतील. याशिवाय, मदत कर्मचारी एकमेकांशी संवाद साधण्यासाठी व्हॉइस ॲक्टिव्हेटेड ५G कनेक्टेड उपकरणांचा वापर करतील. हेल्मेटवर बसवलेल्या या ५G उपकरणांमध्ये कॅमेरा, फ्लॅश लाइट आणि लेझर बीम सारखी फिचर आहेत.

# लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल



## निमित्त

देशाच्या राजकीय अन् सामाजिक जीवनात पोलादी पुरुष (आयर्न मॅन) म्हणून ओळख असलेल्या सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ऑक्टोबर १८७५ रोजी गुजरात राज्याच्या खेडा जिल्ह्यातील करमसद येथे झाला अन् ब्रिटिश राजवटीला तगडं आव्हान देणारा जणू देशात पोलादी पुरुषच उदयास आला.वल्लभभाई यांच्या वडिलांचे नाव झवेरभाई तर,आईचे लाडबाबेन.वयाच्या १८ व्या वर्षी त्यांचा विवाह झवेरबा यांच्याशी झाला. त्यांना डाह्याभाई अन् मनिबेन ही दोन अपत्ये.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या अहिंसा व सत्याग्रह या तत्वांवर देशाला स्वातंत्र्य प्राप्तीसाठी जो लढा उभारला गेला,त्यात वल्लभभाई हे अग्रस्थानी होते. त्यांना राष्ट्रीय काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष पद भूषविण्याचा मान मिळाला.

पारतंत्र्याच्या काळात शेतकऱ्यांवर जुलमी कर लादणाऱ्या ब्रिटिश सरकारविरुद्ध स्व.वल्लभभाई पटेल यांनी रणशिंग फुंकले. मिठाचा सत्याग्रह केल्याबद्दल इंग्रज पोलिसांकडून अटक झालेले ते प्रमुख नेते होते. महात्मा गांधी यांच्या छोडो भारत आंदोलनात त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. ते महान देशभक्त अन् लढवैये स्वातंत्र्यसेनानी होते. त्यामुळेच त्यांना जनमानसाकडून पोलादी पुरुष ही उपाधी मिळाली. विविध राज्यातील राष्ट्रप्रेमी नेते, देशभक्त सत्याग्रही अन् क्रांतिकारकांच्या समर्पित बलिदानातून अखेर भारताला स्वातंत्र्य मिळाले अन् इंग्रजांची राजवट संपुष्टात आली. स्वातंत्र्यानंतर पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या केंद्रीय मंत्रिमंडळात सरदार वल्लभभाई पटेल यांची गृहमंत्री म्हणून निवड झाली. तसेच त्यांना उप पंतप्रधान होण्याचादेखील मान मिळाला. गृहमंत्री असतानाच्या काळात हिंदुस्थानातील ५६५ अर्धस्वायत्त संस्थानांचे देशामध्ये विलिनीकरण करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यामुळे त्यांची प्रतिमा जनमानसात अधिकच उजळली.देशाची एकता, अखंडता व सार्वभौमत्व अबाधित ठेवण्यासाठी त्यांनी आपलं सारं आयुष्य पणाला लावलं.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील भरीव योगदानाबद्दल कृतज्ञतेच्या भावनेतून त्यांच्या नावाने विविध शैक्षणिक संस्था उभारल्या गेल्या. तसेच सरदार सरोवर ड्याम, सरदार वल्लभभाई पटेल युनिव्हर्सिटी, सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम, सरदार वल्लभभाई पटेल इंटरनॅशनल एअरपोर्ट आणि सर्वात प्रेक्षणीय स्थळ म्हणजे जगातील सर्वात उंच सरदार वल्लभभाई त्यांचा Statue of Unity of India हा भव्यदिव्य पुतळा उभारण्यात आला असून, त्याचे अनावरण ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते झाले.

महत्वाचे म्हणजे ३१ ऑक्टोबर हा त्यांचा जन्म दिवस राष्ट्रीय एकता दिन म्हणूनही साजरा करण्याचा केंद्र सरकारने निर्णय घेतला. याशिवाय त्यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील नेत्रदीपक कामगिरीसाठी त्यांना भारतरत्न हा किताबही बहाल करण्यात आला.

**-पत्रकार रणवीरसिंह राजपूत, सदस्य, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, ठाणे**

## क्लिक...क्लिक...!



**पाली : रायगड जिल्ह्यात मागील दोन तीन दिवसांपासून सकाळी व रात्री गारवा पडत आहे. त्यामुळे थंडीची चाहूल लागली आहे. डोंगरावर पांढऱ्या शुभ्र व करड्या रंगांचे ढग दाटत आहेत. जणू काही येथे स्वर्गच असल्याचा भास होतो.** (छाया : धम्मशील सावंत)

## आरोग्य प्रहर

# पायावर सतत राहत सूज असेल तर पडेल महागात!



पाय आणि घोट्यात सतत सूज येणे हे मूत्रपिंडाशी म्हणजेच किडनीशी संबंधित आजारांचे लक्षण असू शकते. जर तुम्ही बोटांनी दाबल्यावर पायाच्या त्या भागावर खड्डा किंवा डिंपल तयार होत असेल तर समजून जा तुमची किडनी डेंजर झोनमध्ये आहे.

या लक्षणांना तुम्ही हलक्यात घेत असाल तर भविष्यात तुम्हाला गंभीर समस्यांना समोर जावू शकते. पायावर सूज येणे हे खराब किडनीच्या लक्षणांपैकी एक लक्षण आहे. एका अहवालात असे दिसून आले आहे की सुमारे ३० टक्के मूत्रपिंड रुग्ण खूप उशीर झाला की डॉक्टरकडे जातात. मग उपचारासाठी दोनच पर्याय उरतात, पहिला डायलिसिस आणि दुसरा किडनी प्रत्यारोपण. किडनीशी संबंधित समस्या ओळखण्यासाठी, शरीरावर दिसणार्या काही लक्षणांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. आरोग्य तज्ञ आनंद शिंदे यांच्या मते दोन सोप्या चाचण्या करून तुमची किडनी निरोगी आहे की नाही हे तपासू शकता शकता.

सामान्यत: उच्च रक्तदाब आणि मधुमेहाच्या रुग्णांना किडनीशी संबंधित समस्या असतात. कारण उच्च रक्तदाबामुळे रक्तवाहिन्या आकुंचन पावतात, ज्यामुळे किडनी खराब होऊ शकते. मधुमेहाच्या रूग्णांमध्ये, रक्तातील अतिरिक्त साखर फिल्टर करण्यासाठी मूत्रपिंडांना अधिक मेहनत करावी लागते. मूत्रपिंड निकामी होण्याचे पहिले लक्षण म्हणजे पाणी टिकून राहणे, ज्यामुळे सूज येते. जर तुम्हाला तुमच्या पायाला किंवा घोट्याला सूज येत असेल तर लगेच तपासणी करून घेणे चांगले.

सर्वसमावेशक संवहनी काळजी शरीराच्या कोणत्या रक्ताभिसरण प्रणालीवर परिणाम होतो हे निर्धारित करण्यासाठी संवहनी चाचणी वापरते. रक्ताच्या चाचण्यांद्वारे हे निर्धारित केले जाते की सूज हे मूत्रपिंडाच्या आजाराचे कारण आहे की नाही. पायांवर सूज येणे हे मूत्रपिंडाच्या आजाराच्या सर्वात सामान्य लक्षणांपैकी एक मानले जाते. गुरुत्वाकर्षण पायांकडे अतिरिक्त द्रव खेचते, ज्यामुळे सूज येते. ही परिस्थिती टाळण्यासाठी तुम्ही तुमचे पाय काही काळ उंच ठेवू शकता. तथापि, ही समस्या पुन्हा पुन्हा उद्भवल्यास, आपण डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. मूत्रपिंडाचा आजार शोधण्यासाठी तुम्ही दोन चाचण्या करून घेऊ शकता.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यांत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही श्री. विकास जगन्नाथ मुंगाजी वगैरे यांच्या प्रत्यक्ष मालकी व ताबे वहिवाटीच्या असून, सदरील मिळकती संदर्भात मे. दिवाणी न्यायाधिश, व.स्तर पनवेल यांचे न्यायालयांत स्पे.मु.नं. ३३/२०२३ हा दावा प्रलंबित असुन सदरहू मिळकती संदर्भात कोणीही कोणत्याही प्रकारचा खरेदी विक्री, हस्तांतरण अगर अन्य कोणत्याही प्रकारचा करार मदार करू नये. जर कोणीही सदर खालील नमुद मिळकती संदर्भात कोणताही व्यवहार, करार, मदार केल्यास त्यास आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन (परिशिष्ट)**
**मौजे–ओवळे, ता. पनवेल, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| अ.क्र. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| १ | १४ | ८ | ०.०३.० |
| २ | ४९ | २ | ०.३४.९ |
| ३ | ६ | ६ | ०.६२.७ |

वर नमुद मिळकतीच्या संपादनापोटी पुष्पक नगर (दापोली), ता. पनवेल, जि. रायगड येथे प्लॉट नं. १२५, सेक्टर ८, क्षेत्र १५०० चौ.मी. चा भुखंड आमचे आशिलांना सिडको महामंडळाने इरादीत केलेला आहे व तसे वाटपपत्र दिलेले अहे. वर नमुद मिळकती संदर्भात आमचे अशिलांच्या परवानगी शिवाय कोणताही व्यवहार करण्यांत येवू नये.

येणेप्रमाणे नोटीस दिली
पनवेल
दिनांक : ३१/१०/२०२३

सही/–
**ॲड. एच.बी.वाक्षे**
शॉप नं.२, मस्त्यगंधा, प्लॉट नं.सी–७ व सी–८, सेक्टर २०, नेरुळ, नवी मुंबई–४००७०६
मो.नं.९९८७५१९७९१


# कोयना प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडविण्यासाठी जिल्हा प्रशासन तत्पर



**चौक : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील कोयना प्रकल्पग्रस्तांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी जिल्हा प्रशासन कामाला लागले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निर्देश दिल्याप्रमाणे सोमवारी (दि. ३०) भूमी अधीक्षक रायगड यांनी जिल्ह्यातील खालापूर, पेण, पनवेल, रोहा, माणगाव या तालुक्याचे उपअधीक्षक व प्रकल्पग्रस्तांची बैठक आयोजित करून गावठाण मोजणी, गावठाण विस्तार, गावठाण अभिलेख व गावठाण जागेचे मालकी हक्काचे ७/१२ तयार करण्याबाबत चर्चा केली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ६४ वर्षे प्रलंबित कोयना प्रकल्पग्रस्त जनतेच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी मुख्यमंत्री दालनात वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत कोयना प्रकल्पग्रस्त जनतेचे प्रतिनिधी यांची बैठक आयोजित केली होती. या बैठकीस ग्रामविकास मंत्री, पुनर्वसन मंत्री, सचिव, पुनर्वसन सचिव, कोकण विभागीय आयुक्त, रायगड जिल्हाधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी रायगड यांनी तहसीलदार, गटविकास अधिकारी, अधीक्षक भूमी अभिलेख, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणी पुरवठा, जिल्हा परिषद बांधकाम, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र वीज पुरवठा व वीज वितरण कंपनी यांचेकडून प्रकल्पग्रस्त वसाहती यांच्या नागरी सुविधा, समस्या, पर्यायी जमीन आणि १८ सुविधा उपलब्ध करण्याबाबत चर्चा करण्यात आली. या वेळी अखिल कोयना पुनर्वसाहत सेवा संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# मिठेखार ग्रामपंचायतीत थेट सरपंचपदी भाजपचे अशोक वाघमारे बिनविरोध

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यात ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकीचा जोर भलताच रंग धरू लागला आहे. दरम्यान मिठेखार ग्रामपंचायतीचे थेट सरपंच उमेदवार अशोक वाघमारे हे बिनविरोध निवडून आल्याने मुरूड तालुका व मिठेखार भाजप कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.



मिठेखार ग्रामपंचायतीत थेट सरपंच म्हणून बिनविरोध निवडून गेलेले सरपंच अशोक वाघमारे यांच्या सत्कार सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांचे हस्ते करण्यात आला. या वेळी भाजप जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते व उपजिल्हा प्रमुख दिलीप भोईर यांची उपस्थिती व्यासपिठावर होती.

गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत मिठेखार ग्रामपंचायतीत भाजपने थेट सरपंच व ग्रामपंचायत सदस्य निवडून आले होते. मुरूड तालुक्यात ऐकमेव भाजपची ग्रामपंचायत मिठेखार म्हणून ओळख तयार केली होती. येत्या ५ नोव्हेंबर रोजी मिठेखार ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक होत आहे. या मिठेखार ग्रामपंचायतीत शिवसेनेकडून मिठेखार गावकीच्या सहा जागा देण्यात आल्या आहेत. यामध्ये प्रभाग २ मधून अनंत बेडूजी चवरकर, जितेंद्र रामा रोटकर, वैशाली कमलाकर रोटकर व प्रभाग ३ मधून नितेश माळी, प्रिया चवरकर व नियती रोटकर हे निवडणूक लढवित आहेत. प्रभाग १ मधून नरेश सुतार, नितिन आर्डे व विजय ठाकूर निवडणूक लढवित आहेत.



**माणगाव : येथे रविवारी भाजप महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ आल्या असता त्यांचे भाजप युवा मोर्चाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांनी स्वागत केले** (छाया : सलीम शेख)


## महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल**
**पिनकोड–४१०२०६**
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in
दूरध्वनी क्रमांक ०२२–२७४५२७७८ फॅक्स – ०२२–२७४६७४४०

**ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ११३ (ई-निविदा) सन २०२३-२४**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२–२७४५२७७८ फॅक्स–०२२–२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी–१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई–निविदा सूचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप– या निविदेमध्ये एकूण १ काम समाविष्ठ असून ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक ३०.१०.२०२३ सकाळी १०.०० ते दिनांक ०६.११.२०२३ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

**ई–निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड**
**दिनांक : ३१/१०/२०२३**

**सही/–**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल**

## महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल**
**पिनकोड–४१०२०६**
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in
दूरध्वनी क्रमांक ०२२–२७४५२७७८ फॅक्स – ०२२–२७४६७४४०

**ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. १११ (ई-निविदा) सन २०२३-२४** (फेर विविदा क्र. १)

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२–२७४५२७७८ फॅक्स–०२२–२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी–१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई–निविदा सूचना_www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप– या निविदेमध्ये एकूण १ काम समाविष्ठ असून ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक ३०.१०.२०२३ सकाळी १०.०० ते दिनांक ०८.११.२०२३ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

**ई–निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड**
**दिनांक : ३१/१०/२०२३**

**सही/–**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल**



## पनवेल महानगरपालिका

**ता.पनवेल, जि.रायगड, पनवेल ४१० २०६**

दुरध्वनी कार्यालय : ०२२–२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२–२७४५२२३३
आयुक्त कार्यालय : ०२२ – २७४५२३३९ उपायुक्त कार्यालय : ०२२–२७४५५७५१
ई–मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com

जा.क्र/प.महा/पर्या./३९२३/प्र.क्र. १९/१९२/२०२३ दिनांक :३०/१०/२०२३

### जाहीर आवाहन

पनवेल शहर हद्दीतील सर्व फटाके विक्री करणारे व्यावसायिक व फटाके वापर करणारे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भारत सरकार अधिसूचना क्रमांक G.SR.६८२ (E) dt.५.१०.१९९९ अन्वये १२५ dB (AI) पेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांची निर्मिती, विक्री वापर करण्यास मनाई केली आहे.

अशा फटाक्यांचे उत्पादन, विक्री किंवा वापर बेकायदेशीर आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटाक्यांमध्ये बेरियम सॉल्ट, लिथीयम, आर्सेनिक, लीड, मर्क्युरी, यासारखे घटक असणारे फटाका वापरण्यास बंदी आहे. या घटकांमुळे विषारी वायु तयार होतात हे वायू प्राणी व वनस्पती या दोघांना घातक आहेत. तसेच जनहित याचिका क्र. १५२/२०१५ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटाका विक्रेत्यांनी विस्फोटक व अधिनियम १८८४ आणि त्या अंतर्गत केलेले विस्फोटक नियम २००८ मधील प्रतिबंध व नियम यांची अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. तरी फटाके विक्रेत्यांनी बंदी असलेले फटाके विक्री करु नयेत.

महाराष्ट्र शासनाने माझी वसुंधरा अभियान ४.० आणि स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अभियानांतर्गत फटाके मुक्त, प्लॉस्टिकमुक्त कचऱ्यामुळे, व पर्यावरणपुरक सण उत्सव साजरी करण्याचा प्रयत्न करावा. सदर अभियानांतर्गत नागरीकांनी फटाक्यांचा वापर टाळावा. प्लॉस्टिकचा वापर टाळून कापडी किंवा कागदी पिशवीचा वापर करा, सण समारंभामध्ये पुनर्वापर करण्यायोग्य वस्तुंचा वापर जास्तीतजास्त करावा. पर्यावरण पुरक, प्रदुषणमुक्त व आरोग्यदायी दिवाळी साजरी करावी.

चला तर मग, येणारी दिवाळी हरित व पर्यावरण पुरक दिवाळी म्हणून साजरी करूया. ही दिवाळी आनंदी व सुरक्षित जावो. याकरीता आपणा सर्वांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

**सही/–**
**उपायुक्त (पर्यावरण)**
**पनवेल महानगरपालिका**



## पनवेल महानगरपालिका

**ता.पनवेल, जि. रायगड**

### तात्पुरत्या स्वरुपात फटाके विक्री स्टॉल उभारणेकामी जाहिर सूचना

पनवेल महानगरपालिकेमार्फत सन २०२३ दिवाळी सणानिमित्त तात्पुरते फटाके विक्रीसाठी खाली नमूद केलेल्या ठिकाणी स्टॉल उभारणीसाठी दिनांक ०८/११/२०२३ ते दिनांक १५/११/२०२३ पर्यंतच्या कालावधीसाठी जागा उपलब्ध करुन देणेत येणार आहेत. सदर जागा मर्यादित ठेवणेत आलेल्या आहेत. इच्छुक फटाके विक्री धारकांनी आपल्या लायसन्सची प्रत अर्जासोबत जोडणेची आहे.

| अ.क्र. | नोड | आरक्षण | सेक्टर | भुखंड क्र. | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|
| १) | पनवेल | प्ले ग्राऊंड | २ E | ३६ | ८७६४.५४ |
| २) | कळंबोली | प्ले ग्राऊंड | ४ E | १६ | ५५०७.५२ |
| ३) | खारघर | प्ले ग्राऊंड | १२ | १२ | ६३४३.९५ |
| ४) | कामोठे | प्ले ग्राऊंड | ८ | २५ | ४९७६.८६ |
| ५) | तळोजा | प्ले ग्राऊंड | १० | ११३+११४ | ६६७१.५९ |

सबब, तात्पुरत्या फटाके विक्रीसाठी महानगरपालिकेकडे जागा मिळणेकामी सबंधित इच्छुकांनी फटाके विक्री धारकांनी दिनांक ०६/११/२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिका मुख्यालयात अर्ज जमा करावेत.

**सही/–**
**उप आयुक्त, मालमत्ता**
**पनवेल महानगरपालिका**

**जा.क्र. पमपा/माव्य/३५२३/प्र.क्र.०८/४०५/२०२३**
**दिनांक :– ३०/१०/२०२३**


# नोव्हेंबरमध्ये लोकशाही दिन

**अलिबाग** : जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी करण्यात येते.

नोव्हेंबरमध्ये होणारा लोकशाही दिन सोमवारी (दि. ६) दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात आयोजित केला आहे, असे उपजिल्हाधिकारी विठ्ठल इनामदार यांनी कळविले आहे.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहिर नोटीशीने कळविण्यात येते आहे की, मौजे साई ता. पनवेल, जि. रायगड, येथिल साई ग्रामपंचायत हददीतील खालील प्रमाणे वर्णन केलेल्या जमिन मिळकती आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - साई , तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

| गट क्रमांक | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ. | आकार रु.- पै. |
|---|---|---|---|
| ४३ | – | ०-११-२० ०-०७-२०. | ०.५६ |
| | एकूण क्षेत्र | ०-१८-५६ | |

वर नमूद मिळकत ही १. श्रीराम जनार्दन मोकल २. बामुबाई मधूकर म्हसकर ३. पुनम पांडूरंग मोकक ४. पल्लवी नितीन पाटील ५. अनिता तुळशिदास पाटील ६. प्रमिला संतोष म्हात्रे ७. प्रकाश पांडूरंग मोकल ८ जनाबाई पांडूरंग मोकल यांच्या मालकीची सदरची मिळकत आमचे अशीलांनी १. विश्वनाथ कमल मोकल २. तेजश्री विश्वनाथ मोकल या दोघांनी कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबध, दान, गहाण, पोटगी, लिज भाडेकरु, हक्क, मालकी हक्क व इतर कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांच्या आत खालील नमूद पत्यावर पुराव्यासह लेखी हरकत घ्यावी वरील मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व सदर मिळकतीबाबत खरेदीखताचा व्यवहार पुरा केला जाईल याची नोंद घ्यावी

सही/-
**ॲड. . सुधीर एम. मोरे BA.LL.B**
शॉप नं. 15, सिल्व्हर अपार्टमेंट, रोनक झेरॉक्स जवळ, जुने पनवेल, ता.-पनवेल, जि.-रायगड-४१०२०६ **Ph - ९३२३४०९४०१**

**ठि.: पनवेल**
**दि.31/10/2023**


# खालापुरात कारखान्यामध्ये महिलेचा विनयभंग

**खोपोली : प्रतिनिधी**

अश्लिल नजरेने पाहून मला हॉटेलमध्ये भेटायला येशील का, असे बोलून महिला कर्मचाऱ्याचा विनयभंग करणाऱ्या वसिम इब्राहिम बेडेकर (रा. हाळ, ता. खालापूर) विरुद्ध पीडितेच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित महिला ही डोणवत येथे राहणारी आहे. खानाव गावचे हद्दीतील कंपनीत कामाला असून वसिम त्याठिकाणी व्यवस्थापक आहे. पीडित वसीमच्या केबीनमध्ये काम करीत असताना वसीम समोरील खुर्चीत बसून, तू कामाला लागली तेव्हा गावठी वाटत होतीस. आता तू खूप सुंदर दिसत आहेस, असे बोलून अश्लिल नजरेने पाहून मला हॉटेलमध्ये भेटायला येशील का? असे बोलून पीडित महिलेचे मनास लज्जा वाटेल असे कृत्य केले.

याबाबत पीडितेनी वसीम बेडेकरविरुद्ध खालापूर पोलीस ठाणे येथे तक्रार दिली असून भा.दं.वि.क.३५४ अ,३५४ ड,(१))(अक) प्रमाणे वसीमविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास मपोसई सरिता मनवर या करीत आहेत.


## PUBLIC NOTICE

M/s. Rare Livspace through its partner Mr. Roshan Raghwani and Mr. Ajay Parmar, having their address, A-504, Delta Tower 2, Plot No.-2, Sector-8, Ulwe, Navi Mumbai, hereby publish in view to be known to the public at large that we possess and have an absolute, legal and exclusive ownership of all that piece and parcel of land admeasuring 2150 sq.m. bearing Survey No.-3/3/B, within Village-Newali, Taluka-Panvel, Dist.-Raigad.

| | |
|---|---|
| Name and address of the Owner | M/s. Rare Livspaces<br>A-504, Delta Tower 2, Plot No.-2, Sector-8, Ulwe, Navi Mumbai. |
| Name and address of the Architect | Abhipray Consultants<br>602, Ratna Enclave, Plot No.-59, Sector-20, Roadpali, Kalamboli, Navi Mumbai – 410 218. |
| Survey No. Village and Tehsil Name of the land under reference along with description of its boundaries | Survey No.-3/3/B, Village-Newali, Tehsil-Panvel, Dist.-Raigad.<br>On or towards the East side – Adjacent Survey no.-12 & Survey no.-4/1.<br>On or towards the West side – Adjacent Survey no.-3/3/A.<br>On or towards the South side – Adjacent Survey no.-5/1.<br>On or towards the North side – Village Road No.-33. |
| Commencement Certificate No.- | **CIDCO/NAINA/Panvel/Newali/BP-00665/CC/2023/0421, on dated 21st Aug. 2023** |
| FSI Permitted | One |
| No. of Residential / Commercial unit | 65 Residential unit and 05 Commercial unit |

For further details, please contact us at A-504, Delta Tower 2, Plot No.-2, Sector-8, Ulwe, Navi Mumbai.

The Project is registered having MahaRERA No.- P52000052666 and is available on the Website https://maharera.mahaonline.gov.in under Registered projects.



## उरण नगरपरिषद

**निविदा सुचना**

उरण नगरपरिषदेच्या विद्युत विभागाकडील खाली नमूद केलेल्या कामी अनुभवी ठेकेदारामार्फत मोहरबंद निविदा मागविणेत येत आहेत. सदरची निविदा मा. मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांचे नावे कार्यालयीन वेळेत दाखल करायच्या आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | इसारा अनामत | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|
| १. | उरण नगरपरिषद कार्यालयात ३० के. व्ही.ए. स्टॅबिलायझर बसविणेबाबत. | रु. ३००० | रु. १००० |

**अटी/शर्ती :–**

१. निविदा शुल्क (ना परतावा) नगरपरिषदेच्या लेखा विभागात कामकाजाच्या वेळेत दि. ३१/१०/२०२३ ते दि.०६/११/२०२३ रोजी पर्यंत रोखीने भरल्यास विद्युत विभागात सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत कोऱ्या निविदा फॉर्मचे नमुने उपलब्ध होतील.
२. इसारा अनामत दि. ३१/१०/२०२३ ते दि.०६/११/२०२३ रोजी दुपारी ३.३० वाजेपर्यंत लेखा विभागात स्विकारली जाईल.
३. सिलबंद निविदा/दरपत्रके दोन लखोटे पद्धतीने कार्यालयीन सुट्टीचे दिवस सोडून इतर कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत आवक / जावक विभागात स्विकारण्याची अंतिम दि.०६/११/२०२३ रोजीचे दुपारी ४.०० वाजेपर्यंत असेल. तसेच मुदतीनंतर आलेल्या निविदा / दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत. किंवा याबाबत कोणतीही कारणे मान्य केली जाणार नाहीत.
४. निविदा सादर करतेवेळी लखोटा क्र. १ मध्ये इसारा अनामत रोखीने भरलेली मुळ पावती, नोंदणी प्रमाणपत्र, शॉप लायसंस, कामाच्या अनुभवाचेप्रमाणपत्र व पॅनकार्ड, GST प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.
५. सदर दर GST सह वाहतूक खर्चासह भरण्यात यावेत.
६. लखोटा क्र. २ मध्ये उरण नगरपरिषदेने विहित नमुन्यात तयार केलेल्या निविदा फॉर्ममध्ये भरलेले दरपत्रक सादर करणेचे आहे.
७. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या वैध निविदा शक्यतो निविदा स्वीकृतीच्या अंतिम दिनी सायं. ५.०० वाजता किंवा शक्य न झाल्यास लगतच्या दुसऱ्या दिवशी पुरवठादार / ठेकेदार किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी यांचे सक्षम मे. मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांच्या दालनांत उघडणेत येतील..
८. कोणतीही निविदा/दरपत्रक पूर्णपणे किंवा अंशतः स्विकारणे किंवा आलेल्या सर्व निविदा/ दरपत्रक नाकारणेचे सर्व अधिकार नगरपरिषदेचे असतील. तसेच कोणतेही कारण न देता निविदा / दरपत्रक रद्द करण्याचे अधिकार नगरपरिषदेचे असतील.

जा.क्र. उनप/विद्युत/१९२९/२०२३–२४
उरण नगरपरिषद, उरण, जि. रायगड.
दिनांक : ३०/१०/२०२३

**सही/–**
**मुख्याधिकारी,**
**उरण नगरपरिषद, उरण**

# सिडकोमध्ये दक्षता जनजागृती सप्ताह

## शपथविधीसह विविध उपक्रम

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

केंद्रीय दक्षता आयोगाच्या निर्देशांनुसार सिडको महामंडळामध्ये आयोजित करण्यात आलेल्या दक्षता जनजागृती सप्ताहाचा प्रारंभ ३० ऑक्टोबर रोजी झाला. केंद्रीय दक्षता आयोगाच्या निर्देशांनुसार ३० ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर या कालावधीदरम्यान सिडकोमध्ये दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या वर्षीच्या दक्षता जनजागृती सप्ताहाची भ्रष्टाचाराला विरोध करा : देशासाठी समर्पित रहा ही संकल्पना आहे.

या वेळी सहव्यवस्थापकीय संचालक राजेश पाटील, शांतनु गोयल, डॉ. कैलास शिंदे, मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे, व्यवस्थापक (कार्मिक) फैय्याज खान आणि



सिडको एम्प्लॉईज युनियन अध्यक्ष विनोद पाटील यांसह सिडकोतील विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आल्यानंतर राजेश पाटील यांनी उपस्थितांना सत्यनिष्ठेची शपथ दिली तसेच दक्षता सप्ताहानिमित्त राज्याचे राज्यपाल यांनी दिलेल्या संदेशाचे व मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेल्या शुभेच्छांचे वाचन त्यांनी उपस्थितांसमोर केले.

त्यानंतर मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अपर पोलीस उपायुक्त (सेवानिवृत्त) विलास तुपे यांनी भ्रष्टाचार प्रतिबंध या विषयावर कार्यशाळा घेतली.

केंद्रीय दक्षता आयोगातर्फे भ्रष्टाचारविरोधी जनजागृती निर्माण करण्यासाठी दरवर्षी दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शनानुसार देशभरातील शासकीय व निमशासकीय संस्था आणि कार्यालयांमध्ये दक्षता सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. अधिकारी व कर्मचारी वर्ग, सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी, समाजाच्या अशा विविध घटकांमध्ये भ्रष्टाचारविरोधी जागृती निर्माण होऊन भ्रष्टाचाराचे निर्मूलन व्हावे या उद्देशाने दक्षता सप्ताहाचे आयोजन करण्यात येते.

### कर्मचाऱ्यांसाठी विविध स्पर्धा


सप्ताहामध्ये भ्रष्टाचाराला विरोध करा : देशासाठी समर्पित रहा या विषयावर सिडोतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकरिता निबंधलेखन स्पर्धा व घोषवाक्य तयार करण्याची स्पर्धा, या उपक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे.

सिडकोमध्ये ३० ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०२३ या दक्षता सप्ताहाच्या कालावधीत विविध कार्यक्रम, कार्यशाळा आणि उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# भटक्या श्वानावर अनैसर्गिक अत्याचार करणारा ताब्यात

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

भटक्या मादी श्वानावर अनैसर्गिक अत्याचार करणाऱ्या एका व्यक्तीला कोपरखैरणे परिसरातील तरुणांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिल्याची घटना उघडकीस आली आहे. संजय कदम (वय ४३) असे या व्यक्तीचे नाव आहे.



कोपरखैरणे पोलिसांनी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करून अटक केली आहे. संजय कदम हा कोपरखैरणे सेक्टर-१९ मध्ये राहण्यास असून मजुरीचे काम करतो. २८ सप्टेंबरला पहाटे ३.३० च्या सुमारास त्याने परिसरातील एका भटक्या मादीला इमारतीच्या तळमजल्यावरील जिन्यामध्ये नेले. तेथे त्याने अनैसर्गिक अत्याचार केले. हा प्रकार सोसायटीच्या सीसी टीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला होता. व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर कोपरखैरणेत राहणाऱ्या सुशील जाधव आणि त्याच्या सहकाऱ्यांनी सीसीटीव्ही फुटेजद्वारे श्वानावर अत्याचार करणाऱ्या व्यक्तीचा शोध सुरू केला.

अखेर गुरुवारी रात्री या तरुणांना व्हिडीओमधील व्यक्ती संजय नजरेस पडला. त्यांनी त्याला पकडून कोपरखैरणे पोलिसांच्या ताब्यात दिले. तसेच श्वानावर जबरदस्ती अत्याचार करतानाचा व्हिडीओही दिला. त्यानंतर पोलिसांनी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करून अटक केली.

# पनवेल ओरियन मॉलमध्ये अवतरला विक्रम लँडर



**खारघर : प्रतिनिधी,**
**पनवेल : वार्ताहर**

देशाभिमान जागविणाऱ्या भारताची यशस्वी चांद्रयान मोहिमेतील विक्रम लँडरची हुबे हुब प्रतिकृती पनवेलमधील ओरियन मॉलमध्ये अवतरली आहे. दिवाळीच्या पार्श्वभुमीवर ओरियन मॉलने यावर्षी हि नवीन थीम साकारली आहे.

दरवर्षी मॉल प्रशासनाकडून विविध उपक्रम राबवत सामाजिक बांधिलकी जपली जाते. मागील वर्षी साकारलेली आयएनएस विक्रांतची प्रतिकृती पाहण्यासाठी हजारो नागरिकांनी मॉलला भेट दिली होती. हा प्रतिसाद पाहता तत्कालीन सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी हीच प्रतिकृती थेट मंत्रालयात प्रदर्शनासाठी ठेवले होते. पुन्हा एकदा दिवाळीच्या पार्श्वभूमीवर विक्रांत लँडरची प्रतिकृती दिवाळीचे निषेश आकर्षण असणार असल्याची माहिती ओरियन मॉलचे मालक मंगेश परुळेकर यांनी दिली.

या विक्रम लँडरची प्रतिकृती उभारण्यास लाखो रुपयांचा खर्च आला आहे. सनबोर्ड, फायबरग्लास, स्टील, लाकूड आदी साहित्य वापरून साठे स्टुडिओच्या माध्यमातून ही प्रतिकृती उभारण्यात आली आहे.

# नेहा गवळ यांना समाजरत्न पुरस्कार

**नवी मुंबई : बातमीदार**

आधार सामाजिक सेवा संस्था महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या वतीने भारत डॉक्टर्स असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष आमिर मुलानी यांच्या हस्ते राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार देऊन सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उत्तम कार्य केल्याबद्दल नेहा गवळी यांचा गौरव करण्यात आला.

या वेळी मंचावर जय जय स्वामी समर्थ मालिकेतील प्रसिद्ध अभिनेते बलराज माने, सिने अभिनेत्री ऐश्वर्या दौंड, सिने दिग्दर्शक अभिनेता प्रकाश धिंडले, आदित्य राजे मराठे, डॉ. गौरव भोसले, उपनिरीक्षक रेखा देशपांडे, प्रसिद्ध निसर्गो पचार नाडी तज्ज्ञ डॉ मनीषा गुरव, डॉ. गणेश पाटील हे मान्यवर उपस्थित होते.



# होपमिरर फाऊंडेशनच्या माध्यमातून अनेकांचा गौरव

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

होपमिरर फाउंडेशनने २७ ऑक्टोबर २०२३ रोजी नवी मुंबईतील वाशी येथील विष्णुदास भावे सभागृहात गोल्डन ह्यूमैनिटी अवार्ड देऊन सामाजिक कार्यकर्ते, पोलीस अधिकारी, महापालिका अधिकारी, भारतातील दिव्यांग क्रिकेट खेळाडू, कलाकार आणि इतर अनेकांचा गौरव व सत्कार केला.

रमझान शेख यांनी मार्च २०२० मध्ये लॉकडाऊनदरम्यान होपमिरर फाउंडेशनची स्थापना केली. लोकांसाठी उभे राहण्यासाठी आणि त्यांचे जीवन सुधारण्यासाठी समर्पित, ही रमझान शेख यांची भूमिका होती. विविध सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यात आणि चांगल्या बदलांना चालना देण्यासाठी स्वयंसेवी संस्था अनेकदा महत्त्वाची भूमिका बजावतात.



रामदासजी आठवले यांना अवॉर्ड शोचे प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केल्याने शोची भव्यता द्विगुणित झाली. होपमिरर फाऊंडेशनने एका पुरस्कार कार्यक्रमाचे आयोजन केले होते ज्यामध्ये व्हीलचेअर क्रिकेटपटू रमेश सरतापे, शिवाजी पवार आणि संतोष कोकरे तसेच महानगरपालिका अधिकारी जितेंद्र मडवी, अरविंद पाटील आणि आनंद गोसावी यांना सन्मानित करण्यात आले आणि पुरस्कार देण्यात आले. ही ओळख त्यांच्या विलक्षण कामगिरी आणि त्यांच्या विशिष्ट विषयातील योगदानावर प्रकाश टाकते.

या सोहळ्यात पोलीस अधिकारी उत्तम तारकसे, संजय फुलकर, विमल बिडवे यांचाही सन्मान करण्यात आला.कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस अधिकाऱ्यांनी केलेल्या वचनबद्धतेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान कौतुकास्पद आहे. शोमधील पाहुण्यांमध्ये बॉलिवूड अभिनेत्री शशी शर्मा यांचाही समावेश होता. सिमरन आहुजा, एक अभिनेत्री आणि आंतरराष्ट्रीय होस्ट आणि दादासाहेब फाळके यांचे नातू चंद्रशेखर पुसाळकरही होते. या समारंभात सामाजिक कार्यकर्ते, कलाकार, क्रिकेट समालोचक आणि पत्रकार सह विविध क्षेत्रातील अनेक पुरस्कारा साठी उपस्थित होते.

> **रामदास आठवले अवॉर्ड शोसाठी आल्याबद्दल मनापासून धन्यवाद आणि त्यासोबतच मी सर्व पुरस्कार विजेत्यांचा आणि पाहुण्यांचाही आभारी आहे. अवॉर्ड शोचा मुख्य उद्देश लोकांना प्रेरणा देणे हा आहे आणि तो यशस्वी झाल्याचा आनंद आहे.**
> **-रमझान शेख, संस्थापक आणि अध्यक्ष, होपमिरर फाऊंडेशन**

# माणुसकी फाउंडेशनकडून स्वच्छतादुतांचा सन्मान

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

घाण, कचरा साफ करून शहरातील नागरिकांना निरोगी ठेवण्याचे काम करणाऱ्या स्वच्छतादुतांचा सन्मान करणारा व त्यांना संगीतमय क्षण देणारा कार्यक्रम गोठिवली येथील पालिका शाळा क्र.४६ मध्ये झाला. कार्यक्रमाला शासकीय अधिकारी डॅनियल वाघमारे तर मुख्याध्यापिका कल्पना गोसावी यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे आकर्षण बालकवी प्रसाद माळी ठरला.

कोविडसारख्या महामारीत स्वच्छतादुतांनी अखंडपणे भीती न बाळगता, तहानभूक पर्वा न करता आपले काम निःस्वार्थीपणे केले. त्यावेळी कुणी साधे पाणी पिण्यासाठी द्यायला पुढे येत नव्हते. आजही हे दूत उन्हात काम करतात त्यावेळी



त्यांच्याकडे पाण्याची बाटली सोबत असावी या निरपेक्ष भावनेने माणुसकी फाउंडेशनने या सफाईदुतांना पाणी बॉटल देवून त्यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते केला. तसेच त्यांच्या मनोरंजनासाठी फाउंडेशनच्या सदस्यांनी गाणी घायली. काही मान्यवर कविंनी आपल्या कविता सादर केल्या तर ज्येष्ठ माळी कामगार सफाई दुत रोहिदास जाधव यांनी पोवाडा सादर केला. माणुसकी फाउंडेशनचे प्रमुख किशोर जाधव यांनी प्रस्तावना मांडली व संस्थेचे उद्देश, मानस विषद केले.

मुख्याध्यापिका कल्पना गोसावी यांच्या माध्यमातून झालेल्या ह्या अभिनव कार्यक्रमाचे कौतुक, प्रमुख अतिथी वाघमारे यांनी करीत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. समाजसेवक निलेश कचरे, पोलीस अधिकारी सतिश रूपसिंग गिरासे यांनीही सदर उपक्रमाचे कौतुक केले. पालिका शिक्षक नारायण लांडगे पाटील, किरण थोरात ,राऊत मॅडम यांनी कविता वाचन करून उपस्थितांची मने जिंकली. बालकवी प्रसाद माळी याच्या भोंगा वाजलाय कवितेने सभागृहात काही काळ चैतन्याचे वातावरण पाहायला मिळाले.

माणुसकी फाउंडेशनचे प्रमुख किशोर जाधव, नाना अहिरराव, गौरी वाघ, सागर मौर्या, अनिलकुमार उबाळे, अक्षय गोटमुकले , प्रीती, अनिता सुतार, राहुल, योगेश जाधव, किरण थोरात,यांनी विशेष मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी केला. आभार गौरी वाघ यांनी मानले.

# रोजगार मार्गदर्शन शिबिरास तरुण-तरुणींचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

दहावी आणि बारावीचे वर्षे विद्यार्थ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. या दोन वर्षांत विद्यार्थ्यांचा जीवनाला वेगळे आणि महत्त्वाचे वळण मिळत असल्याने शिक्षण आणि करिअर घडविण्यासाठी विविध क्षेत्रांची माहिती देण्यासाठी रोजगार मार्गदर्शन, व्यवसाय मार्गदर्शन व सुयोग्य करिअर मार्गदर्शन शिबिर उपयुक्त असते याच अनुषंगाने भारतीय जनता पक्ष, नवी मुंबई यांच्या वतीने दि. २९ ऑक्टोबर २०२३ रोजी सीबीडी येथील सेक्टर-३ ए, वारकरी भवन येथे रोजगार मार्गदर्शन शिबिराचे उद्घाटन आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाले.



रोजगार मार्गदर्शन शिबिरास प्रमुख मार्गदर्शक म्हणून इंटीग्रिटी करिअर सोलुशन चे संचालक युवराज पवार यांनी भविष्यातील करिअर, नियोजनाविषयी, करिअरमधील विविध पर्याय व अभ्यासक्रमाविषयी तरुण-तरुणींना तसेच विद्यार्थ्यांना रोजगार, व्यवसाय तसेच करिअर संबंधित योग्य ते मार्गदर्शन केले. दहावी नंतरच्या शिक्षणाच्या विविध संधी, बारावी नंतरच्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा, व्यक्तिमत्व विकास यासोबतच इतर विविध विषयांबाबत मार्गदर्शन केले.

या वेळी माजी नगरसेवक दीपक पवार, माजी नगरसेवक निलेश म्हात्रे, माजी नगरसेविका सुरेखा नरभागे, ज्येष्ठ कार्यकर्ते गोपाळराव गायकवाड, डॉ. राजेश पाटील, विजय घाटे, दत्ता घंगाळे, राजेश रॉय, विकास सोरटे, समाजसेवक पांडुरंग आमले, राजेश रॉय, सुहासिनी नायडू, जयश्री चित्रे, आरती राऊल, संदेश पाटील, संजय ओबेरॉय तसेच असंख्य विद्यार्थी व तरुण-तरुणी उपस्थित होत्या.

# नवी मुंबईत जनजागृतीपर वॉकेथॉन; १२०० जणांचा सहभाग



**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी येथील मिनी सी शोअरपासून सुरू झालेल्या पाच किमी अंतराच्या वॉकेथॉनमध्ये १२००हून अधिक नागरिकांनी सहभागी होत कर्करोगाविषयी जनजागृती करण्यासोबतच स्वच्छ शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नवी मुंबई शहर स्वच्छतेविषयी जागरुकता केली.

वाशी सेक्टर १० ए येथील मिनी सी शोअर येथून सुरू झालेली ही वॉकेथॉन सागर विहारपासून सेक्टर ३मार्गे वाशी पोलीस स्टेशन ते पुन्हा मिनी सी शोअर अशी पाच किमी. अंतरामध्ये आयोजित करण्यात आली होती. या वॉकेथॉनमध्ये ओल्या व सुक्या कचऱ्याच्या डब्यांचे प्रतिकरुप असलेल्या ओलू व सुकू या मॅस्कॉटमुळे विशेष रंगत आली. नवी मुंई महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त तथा स्वच्छ भारत मिशनचे नमुंमपा नोडल अधिकारी डॉ. बाबासाहे राजळे यांनी कर्करोगाच्या जनजागृतीला स्वच्छता अभियानाच्या जागरूकतेची जोड देत आयोजकांनी सामाजिक बांधिलकी जपल्याबद्दल आभार व्यक्त केले.

चला, कॅन्सरची भिती घालवूया हा संदेश प्रसारित करीत आयोजित या स्तन कर्करोग विषयक वॉकेथॉनमध्ये ४००हून अधिक कर्करोगावर मात करणाऱ्या व्यक्ती उत्साहाने सहभागी झाल्या होत्या. त्यांचा विशेष सन्मान या वेळी करण्यात आला. या वेळी नवी मुंई महापालिकेचे घनकचरा व्यवस्थापन विभाग उपआयुक्त डॉ. बाबासाहे राजळे, अपोलो रुग्णालयाचे पश्चिम विभागीय विशेष कार्य अधिकारी संतोष मराठे, अपोलो रुग्णालयातील कर्करोगतज्ज्ञ डॉ. निता नायर, आरोग्य सल्लागार रिचा भार्गव, लेट्स सेलिब्रेट फिटनेस संस्थेच्या प्रमुख रिचा समीत आर्दीनी सहभागी नागरिकांचा उत्साह वाढविला.

# पनवेलमध्ये वकिलांनी रंगवली काव्यमैफल

**पनवेल : वार्ताहर**

वकिलांना नेहमी साक्ष घ्यावी लागते. पुरावे सादर करावे लागतात मात्र कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने वकील वर्गाने चक्क चंद्राची साक्ष घेतली. त्याच्या साक्षीनं कवी मनाच्या वकिलांनी कविता सादरीकरणाचे पुरावेच तपासले. 'चंद्र आहे साक्षीला' या कार्यक्रमाचे आयोजन पनवेल बार असोसिएशन, पनवेल तालुका अधिवक्ता परिषद आणि संस्कार भारती यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल जिल्हा न्यायालयाच्या प्रांगणात करण्यात आले होते.

चंद्राच्या शीतल प्रकाशामध्ये आणि पणत्यांच्या चांदण्या प्रकाशात आयोजित केलेल्या या काव्य संमेलनामध्ये वकील मनोज म्हात्रे, ज्योती उरणकर, धनराज तोकडे, माधुरी थळकर, ॲड सुचिता यांची कन्या सावी म्हात्रे, शांताराम बेडेकर, पांडेपाटील इत्यादी वकिलांनी व कुटुंबीयांनी कविता सादर केल्या. प्रत्येक वयातला चंद्र हा वयानुसार कधी हट्टी, कधी सोज्वळ, कधी प्रगल्भ कधी गंभीर बनतो तर कधी चांद्रयानही आपलंसं करतो. अशा कवी मनाची गुंफण या काव्य मैफिलीमध्ये गुंफण्यात आली. अगदी वकिली व्यवसायालाही काव्य रचनांची



जोड देऊन कवी मनाच्या वकिलांनी मनाचा गाभारा रिता केला. अर्थातच कोजागिरीनिमित्त या शब्दांकित कार्यक्रमाला जोड दिली, ती चंद्राच्या साक्षीने दूध पिण्याला. पनवेल बार असोसिएशनच्या वतीने भोजन व मसाले दुधाची व्यवस्था ही करण्यात आली होती. पनवेल बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ आणि संस्कार भारती कोकण प्रांत उपाध्यक्ष सुनीता खरे यांच्या हस्ते कार्यक्रमाला सुरुवात झाली.

उपस्थित सर्व न्यायाधीश वृंदाचे स्वागत एडवोकेट मनोज भुजबळ आणि सुनीता खरे यांच्या हस्ते तुळशीचे रोप आणि स्मृतिचिन्ह देवून करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संस्कार भारती पनवेल महानगर महामंत्री एडवोकेट अमित चव्हाण यांनी संविधानाचा अर्थ जपणाऱ्या वकिलांनी चंद्राच्या साक्षीने कायदा आणि समाजमन याचा समतोल बाळगायला हवा आणि या निमित्ताने वकिलांनाही व्यक्त होता यावे यासाठी अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन केले असल्याचे सांगितले. महर्षी वाल्मिकी प्रगट दिनाचे आणि कोजागिरी पौर्णिमा याचे औचित्य साधून ते म्हणाले की, महर्षींच्या रामायणातून सर्वसामान्य नागरिकाना एकत्र येऊन कौटुंबिक आणि सामाजिक अधर्मावर मात करण्याची प्रेरणा मिळते जी आज संविधान आणि लोकशाही तत्व जपण्यासाठी आवश्यक आहे.

संस्कार भारती कोकण प्रांत उपाध्यक्ष सुनीता खरे यांनी शरद ऋतूतील कोजागिरी पौर्णिमेचे स्थान, महत्त्व आणि संपूर्ण बारा महिन्यातील पोर्णिमाचे महत्त्व याविषयीची माहिती दिली. अध्यक्ष स्थानावरून बोलताना ॲड. मनोज भुजबळ यांनी वात्सल्य आणि ममत्वाच उत्तम उदाहरण गवळण हिरकणीचा विशेष उल्लेख करून अशा प्रकारच्या कार्यक्रमांमधून वकिलांमधील कला जोपासल्या जात आहेत आणि वकिलांमधील ताणतणाव नाहीसा होऊन त्यांच्यामध्येही एक उत्साहाचे वातावरण तयार व्हावे, यासाठी आपण नेहमीच अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित करू असे आश्वासन दिले.

कार्यक्रमासाठी ॲड. जुईली चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले तर काव्य मैफिलीची सूत्रे एड.चंद्रकांत मढवी यांनी सांभाळली कार्यक्रमासाठी वकिल वृंद त्यांचे कुटुंबीय आणि संस्कार भारती चे कार्यकर्ते उपस्थित होते. पनवेल जिल्हा न्यायाधीश व त्यांचे सहकारी दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर आणि कनिष्ठ स्तर आणि न्यायालयीन कर्मचारी वर्ग उपस्थित होते त्यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.

## निवडक

### जातीवाचक शिविगाळप्रकरणी गुन्हा

**माणगाव** : जातीवाचक शिविगाळी केल्याप्रकरणी आरोपीवर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना शनिवारी (दि. २८) तिलोरे गावाजवळील हॉटेलमध्ये घडली. याबाबतची फिर्याद मालती रवींद्र राव (वय ४०, रा. इंदापूर बौद्धवाडी) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली. आरोपी सखाराम गोपाळ धाडवे (वय ५०, रा. इंदापूर नवगणे आळी) यांनी फिर्यादी मालती रवींद्र राव यांना किरकोळ कारणावरून जातीवाचक शिविगाळी केली. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अधिक तपास उपविभागीय पोलीस अधिकारी नितीनकुमार पोंदकुले हे करीत आहेत.

### शाळकरी मुलावर भटक्या कुत्र्यांचा हल्ला

**महाड** : भटक्या कुत्र्यांनी केलेल्या हल्ल्यात एक आठ वर्षांचा मुलगा गंभीर जखमी झाल्याची भयंकर घटना महाड तालुक्यातील धामणे बौद्धवाडी येथे घडली आहे. समर मंगेश प्रभाकर असे या मुलाचे नाव असून तो गावातील प्राथमिक शाळेत इयत्ता तिसरीमध्ये शिकत आहे. शाळेतून दुपारच्या सुट्टीत घरी येत असताना पाच ते सहा भटक्या कुत्र्यांची झुंड त्याच्या अंगावर धावून आली. तो घाबरून पळत असताना कुत्र्यांनी त्याचा पाठलाग करून शरीरावर अनेक ठिकाणी दंश केल्याने तो गंभीररित्या जखमी झाला. त्याला तातडीने महाड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे त्याच्यावर प्राथमिक उपचार करून पुढील उपचारार्थ जे. जे. रुग्णालय, मुंबई येथे हलवण्यात आले आहे.



**माणगाव : विवा कॉलेज येथे लोकनेते स्व. अशोकदादा साबळे यांच्या पुण्यथितीनिमित्त जर्नल वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास राजिपचे माजी सभापती अ‍ॅड. राजीव साबळे, सुमित काळे, आदर्श शिक्षिका विनया जाधव, कॉलेज चेअरमन विनया ढेपे, प्राचार्य डॉ. विवेक ढेपे, उपप्राचार्य योगेश रानभरे, यश काळे आदी उपस्थित होते.**

# पाली प्राथमिक आरोग्य केंद्रात ५० टक्के पदे रिक्त

## खासगी रुग्णालयात मोजावे लागतायेत अधिक पैसे

**पाली : प्रतिनिधी**

पाली प्राथमिक आरोग्य केंद्रात दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मंजूर असूनदेखील रिक्त आहेत. डॉक्टरच नसतील तर गर्भवती महिला, गंभीर रुग्णांवर उपचार करणार कोण? असा सवाल उपस्थित होत आहे, तर उर्वरीत ५० टक्के पदे ही रिक्त आहेत. कंत्राटी कर्मचाऱ्यांवर आरोग्य विभागाचा गाडा हाकला जात आहे.





पाली प्राथमिक आरोग्य केंद्रावर साधारण ४३,८१० इतकी लोकसंख्या अवलंबून आहे, तर जांभूळपाडा प्राथमिक आरोग्य केंद्रावर साधारण २८८६१ इतकी लोकसंख्या अवलंबून आहे. सुधागड तालुक्यात १०८ गावे असून तालुक्यातील अनेक गावे दुर्गम भागात आहेत. तालुक्यातील सार्वजनिक प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रातील मंजूर ५७ पदांपैकी तब्बल २८ पदे रिक्त आहेत. पाच वैद्यकीय अधिकारी मंजूर पदांपैकी तीन पदे रिक्त आहेत. यामुळे उपलब्ध डॉक्टर व कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण येत आहे. तालुक्याचे मुख्य ठिकाण असलेल्या पाली शहरातील प्राथमिक केंद्रातील दोन्हीही वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत तर जिल्हा परिषद दवाखाना खवली येथील एका वैद्यकीय अधिकारी यांचे पद रिक्त आहे. गरोदर महिला, अपघातग्रस्तांना अलिबागला जावे लागते.

तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रातील आरोग्य सेविका १७ मंजूर पदांपैकी १३ रिक्त, आरोग्य सेवक सात मंजूर पदांपैकी पाच रिक्त, औषध मिश्रक तीन मंजूर पदांपैकी दोन रिक्त, प्रयोगशाळा तंत्रज्ञ दोन मंजूर पदांपैकी एक रिक्त, शिपाई चार मंजूर पदांपैकी दोन रिक्त, कुष्ठरोग तंत्रज्ञ दोन मंजूर पदांपैकी दोन दोन्ही पदे रिक्त, वैद्यकीय अधिकारी पाच मंजूर पदांपैकी तीन रिक्त असे एकूण २८ रिक्त पदे सुधागड तालुक्यातील सार्वजनिक आरोग्य विभागात आहेत.

### लसीकरण, औषधोपचाराला रखडपट्टी

***आरोग्यसेविकांच्या मंजूर १७ पदांपैकी तब्बल १३ पदे रिक्त असल्याने रुग्णांचे प्रचंड हाल होत आहेत. परिणामी सर्व प्रकारचे लसीकरण, पोलिओ डोस, विविध आजारांची नोंद व औषधोपचार, रोग प्रतिबंधक कामे, आरोग्य विषयक जनजागृती, आरोग्य शिक्षण, गरोदर स्त्रिया व विद्यार्थ्यांची तपासणी, शासनाच्या विविध योजना तळागाळात पोहचविणे आदी कामे रखडतात.***

**सुधागड तालुक्यातील आरोग्य विभागातील रिक्त पदांसंदर्भात दर महिन्याला लेखी अहवाल जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडे सादर करण्यात येतो. याबाबत सातत्याने पाठपुरावा करत आहोत. सद्यस्थितीत पाली प्राथमिक आरोग्य केंद्र व खवली जिल्हा परिषद दवाखान्यातील रिक्त वैद्यकीय अधिकारी पदांचे काम राष्ट्रीय बालसंस्थामधील वैद्यकीय अधिकारी यांच्या सहकार्याने आरोग्य सेवा देणे सुरू आहे.**

**–डॉ. शशिकांत मढवी,**
**तालुका आरोग्य अधिकारी, सुधागड**

## पेणनजीक भरधाव ट्रेलरची कारला धडक

### दोन जण जखमी

**पेण : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर उंबर्डे फाटा येथे भरधाव ट्रेलर चालकाचा ट्रेलवरील ताबा सुटून ट्रेलर विरूद्ध दिशेला जाऊन इको कारला जोरदार धडकला. या अपघतात इको कारमधील दोघे जण जखमी झाले आहेत.



याबाबत फिर्यादी रोहित राजाराम म्हात्रे (वय २९, रा. उंबर्डे फाटा) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार ट्रेलरचालक प्रल्हाद सिंग (वय ५१, रा. लखाहार, जि. प्रतापगढ, उत्तर प्रदेश) हा मुंबई-गोवा महामार्गावरून ट्रेलर (एमएच. ४३ बी. ९९५६) वडखळहून पेणकडे भरधाव वेगात जात असताना उंबर्डे फाटा येथे चालकाचा ट्रेलरवरील ताबा सुटला. यामुळे ट्रेलर विरुद्ध दिशेच्या लेनवर जाऊन इको कारला जोरदार धडकला.

या अपघातात इको कार चालक अनंत गोविंद पाटील व प्रवासी राजन गजानन भगत हे जखमी झाले. अपघातानंतर काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. या प्रकरणी ट्रेलर चालकाविरोधात पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास हवालदार देविदास पाटील हे करीत आहेत.

## बोरवाडी येथील वृद्धाश्रमात रंगली सुरमयी कोजागिरी

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील बोरवाडी येथील माऊली वृद्धाश्रमात शनिवारी (दि. २८) कोजागिरी पौर्णिमेनिमित्त डॉ. व्ही. टी. मेहता यांचा सूर माझा ध्यास माझा या सुगम संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमात भक्तीगीते, अभंग व हिंदी आणि मराठी चित्रपट संगीताचे सादरीकरण करण्यात आले. आशिता रेडीज आणि सुवर्णा भाटे यांनीदेखील गाणी सादर केली. संस्थेचे हे २५वे वर्ष असून त्यानिमित्त विविध कार्यक्रमांची रेलचेल वृद्धांना अनुभवायला मिळत आहे. त्यातील एक भाग म्हणून कोजागिरीनिमित्त संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी संस्थेतर्फे सर्व वृद्ध नागरिकांना गौरविण्यात आले.

# म्हसळा तालुक्यातील सार्वजनिक वाचनालयाचे नामकरण

**म्हसळा : प्रतिनिधी**

स्वातंत्र्यपूर्व कालावधीत म्हसळा तालुका शहरात सार्वजनिक वाचनालय असावे, अशी दृढ कल्पना दिवंगत समाजसेवक म्हसळा वाचनालयाचे संस्थापक अध्यक्ष केशवराव खांबेटे यांनी त्यांचे सहकारी मंडळाचे सहकार्याने सत्यात उतरवली. त्यांचा वारसा पुढे त्यांचे चिरंजीव पत्रकार संजय खांबेटे यांनी कार्यरत ठेवून वडिलांचे नाव अजरामर केले. सर्वांच्या समन्वयाने म्हसळा सार्वजनिक वाचनालयाचे नामकरण केशवराव खांबेटे असे करण्यात आले. रविवारी (दि.२९) रायगडचे स. धर्मादाय आयुक्त प्रतापराव सातव यांचे हस्ते अत्यंत उत्साहात नामकरणाचा सोहळा झाला.

या वेळी आयुक्त प्रतापराव सातव यांनी, वाचन संस्कृतीची जिल्ह्यात जोपासना आणि वृद्धी होण्यासाठी ग्रंथालय चळवळ वृद्धींगत केली पाहिजे. यासाठी सर्वतोपरी सहकार्य दिले जाईल, असे सांगून शुभेच्छा दिल्या. वाचनालयाचे अध्यक्ष संजय खांबेटे यांच्या अध्यक्षतेत झालेल्या कार्यक्रमाला जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार, डॉ. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी भाईंदरचे दिलीप नवेले, रायगड जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष संजय बोंदार्डे, उपाध्यक्ष श्रीकृष्ण बाळ, कोकण विभाग ग्रंथालय संघाचे कार्यवाह प्रकाश पाटील, नागेश कुळकर्णी, राजेश खेडेकर, माजी सभापती महादेव पाटील, माजी नगराध्यक्ष दिलीप कांबळे, समाजसेवक उदय बापट, वाचनालयाच्या उपाध्यक्ष अपर्णा ओक, अलका कर्पे, नरेंद्र खांबेटे, सुरेश भिडे, मृणाल गोखले, जगदीश गोखले, शेखर भावे ज्येष्ठ संचालक अ.रझाक मेमन, नगरसेविका राखी करंबे, पांडूदादा पाटील, सलीम चोगले, शाहीद उकये, शकूर हुर्जुक, प्रा. मच्छींद्र जाधव, शिरीष समेळ, दिलीप करंबे, डॉ. सुभाष ओक, सुरेश जैन, सुधीर देशपांडे, रेखा धारिया,प्राजक्ता सुतार,विभा खांबेटे आदी मान्यवर उपस्थित होते.

नामकरण सोहळ्याची सुरुवात ग्रंथदिंडीने झाली. वाचनालयात ग्रंथपाल व कर्मचारी म्हणून काम केलेल्या सुवासिनी दातार, अरुणा करडे, विद्यमान ग्रंथपाल उदय करडे, लिपीक सायली चौगुले, प्राची मेंदडकर यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक व आभारप्रदर्शन संचालक सुनील उमरोटकर यांनी, तर सूत्रसंचलन संचालक प्रा. आर. एस. माशाळे यांनी केले. मान्यवरांचा येथोचित सत्कार वाचनालयाचे संचालक मंडळाचे हस्ते करण्यात आला.




## माथेरानमधील रस्त्याची कामे मार्गी लागणार

### तांत्रिक समितीच्या अहवालाला सनियंत्रण समितीची मान्यता

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

माथेरान सनियंत्रण समितीची बैठक नुकतीच अलिबाग येथे झाली. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राकेशकुमार यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक समितीने तयार केलेल्या क्ले पेव्हरब्लॉक रस्त्याच्या अहवालाला समितीने मान्यता दिल्याने हा अहवाल कोर्टाला सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला, त्यामुळे माथेरानची रस्त्याची रखडलेली कामे मार्गी लागतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

अध्यक्ष के. पी. बक्षी, सदस्य सचिव जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे, रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उपवनसंरक्षक व समितीचे इतर सदस्य या वेळी उपस्थित होते.

माथेरानमध्ये नैसर्गिक आपत्तीच्या वेळी तसेच माथेरान नगरपरिषद, महावितरण, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण माथेरान पोलीस स्टेशन यांना आवश्यक ती अवजड वाहने मर्यादित कालावधीसाठी परवानगी देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी रायगड यांना देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय सनियंत्रण समितीने घेतला. या निर्णयाची माहिती सर्वोच्च न्यायालयात देण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले.

सनियंत्रण समितीवर स्थानिक लोकप्रतिनिधी नसल्याने स्थानिकांच्या मागण्या समितीपर्यंत पोहचत नाहीत, त्यामुळे या समितीवर नगराध्यक्ष व स्थानिक आमदारांचा समावेश करण्याची मागणी आमदार महेंद्र थोरवे यांनी केली. त्यांच्या निवेदनावर निर्णय घेण्याची जबाबदारी पर्यावरण प्रधान सचिव प्रवीण दराडे यांच्याकडे देण्याचा निर्णय समितीने घेतला आहे. त्यामुळे लवकरच माथेरानमधील क्ले पेव्हर ब्लॉक्स रस्त्यांची कामे प्रगतीपथावर येतील, अशी अपेक्षा स्थानिक नागरिक करीत आहेत.



## मोर्बा ग्रामपंचायत निवडणुकीत राष्ट्रवादीची घरोघरी प्रचार फेरी



**माणगाव : प्रतिनिधी**

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातील माणगाव तालुक्यातील मोर्बा ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक ५ नोव्हेंबर रोजी होत आहे. ही निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष रायगड जिल्हा शांतता कमिटीचे अशासकीय सदस्य अल्ताफ धनसे यांच्या नेतृत्वाखाली लढत असून रविवारी (दि. २९) सरपंच व सदस्यपदाचे उमेदवार यांनी घर टू घर प्रचार करीत प्रचारफेरी काढली.

मोर्बा ग्रामपंचायत वॉर्ड क्र. ५ व ६मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे सरपंचपदाचे उमेदवार शौकत रोहेकर, वॉर्ड क्र. ५मधील सदस्यपदाचे उमेदवार इकबाल हर्णेकर, जैनब धनसे, शेहनाज अ. लतीफ हर्णेकर, वॉर्ड क्र. ६मधील सदस्य पदाचे उमेदवार मुस्ताक अहंमद आदम जाफर, सुगंधा पवार, फरीदा बडे यांची घर टू घर प्रचार फेरी काढण्यात आली.

या वेळी संताजी पवार, इम्तियाज धनसे, अब्दल्ला हर्णेकर, अब्दल्ला गंगरेकर, यासिन जालगावकर, मोहसीन चिलवाण, वाहिद हर्णेकर, अली कर्जीकर, मुसा मापकर, अकबर खोत, अन्वर बडे, इब्राहिम जालगावकर, हमीद जाफर, सुलेमान इब्राहिम चिलवाण, जलाल जाफर, उमर बंदरकर, आदम रोहेकर, इस्माईल मनेर, सुलेमान धनसे, इरफान राऊत, नजीबमुल्ला धनसे, नदीम टाके, अब्दुल रहिमान धनसे, अब्दुल्ला गंगरेकर, मुआज हर्णेकर आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

## रोह्यात सकल मराठा समाजातर्फे निवेदन

**रोहे : प्रतिनिधी**

जालना येथील अंबड तालुक्यातील अंतरवली सराटी येथे मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे-पाटील उपोषणाला बसले आहेत. या अनुषंगाने उपोषणाला पाठींबा म्हणून रोहा तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने ३१ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर दरम्यान साखळी उपोषण करणार आहेत. यासंबंधी रोहा प्रशासनास समाजाच्या वतीने सोमवारी (दि. ३०) निवेदन देण्यात आले.

या वेळी सकल मराठा समाज अध्यक्ष अप्पा देशमुख, नारायण धनवी, अमित उकडे, नितीन परब, दशरथ साळवी, दीपक देशमुख, प्रशांत देशमुख, सुर्यकांत मोरे, लिलाधर देशमुख, सतीश देशमुख, संकेत देशमुख, अजय लोटणकर, निलेश शिर्के, संदिप सावंत, आदित्य कोंढाळकर आदी उपस्थित होते.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी रोहा नगरपालिका चौकात ३१ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर दरम्यान करण्यात येणार आहे. हे निवेदन सोमवारी सकल मराठा समाजाच्या वतीने प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवल, तहसीलदार व पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांना निवेदन देण्यात आले.



### चौकमध्येही मराठा एकवटले

**चौक : प्रतिनिधी**

मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी खालापूर तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने खालच्या खोपोली बाजारपेठेमधून कॅण्डल मार्च काढण्यात आला.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून मार्चची सांगता करण्यात आली. या वेळी तालुक्यातील मराठा समाजाचे ज्येष्ठ नेते उल्हासराव देशमुख यांनी मनोज जरांगे-पाटील यांना पाठिंबा देण्यासाठी पाठींबा द्या, असे आवाहन केले, तर एकनाथ पिंगळे यांनी साखळी उपोषणाला सर्वांनी वेळ काढून उपस्थित रहा असे आवाहन केले, मराठा समाजाचे राज्य समन्वयक डॉ. सुनील पाटील यांनी समाज बांधवांचे आभार मानले.

विधीतज्ज्ञ राजेंद्र येरूनकर, देशमुख समाज मराठा समाजाचे तालुका अध्यक्ष प्रभाकर देशमुख, ज्येष्ठ निरुपणकार व कीर्तनकार हभप. संदिप यादव, वनिता कांबळे यांच्यासह अनेक महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक सहभागी झाले होते.



## कमळ राज्य मानांकन कॅरम स्पर्धा

# प्रशांत मोरे, अंबिका हरिथ विजेते



**अलिबाग : प्रतिनिधी**

कमळ नागरी सहकारी पतसंस्था अलिबागतर्फे आयोजित करण्यात आलेल्या राज्य मानांकन कॅरम स्पर्धेत पुरुष एकेरीत आंतराष्ट्रीय खेळाडू प्रशांत मोरे (मुंबई) याने विजेतेपद पटकावले. विश्वविजेता संदीप दिवे (मुंबई उपनगर) याला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. महिलांमध्ये अंबिका हरिथ (मुंबई) हिने विजेतेपदाचा मान मिळवला. समृद्धी घाडीगावकर (ठाणे) उपविजेती ठरली. योगेश परदेशी (पुणे) व काजल कुमारी (मुंबई) यांनी अनुक्रमे पुरुष व महिलांमध्ये तृतीय क्रमांक मिळवला. या स्पर्धेत एकूण २७ स्लॅम नोंदविले गेले.

अलिबाग कुरूळ येथील क्षात्रेक्य समाज सभागृहात स्पर्धा खेळली गेली. पुरुषांच्या अंतिम सामन्यात माजी विश्वविजेता प्रशांत मोरे (मुंबई) याने विद्यमान विश्वविजेता संदीप दिवे (मुंबई उपनगर) याचा २५-४, २५-७ असा सहज एकतर्फी पराभव करून विजेतेपद मिळविले. मागील तीन स्पर्धांमध्ये संदीपने प्रशांतला हरविले होते, मात्र या स्पर्धेत प्रशांतने संदीपला पराभूत केले. पुरुषांच्या तृतीय क्रमांकाच्या लढतीत योगेश परदेशी (पुणे) याने सागर वाघारे (पुणे) याचा २५-०, २४-१३ असा पराभव केला.

महिलांच्या अंतिम फेरीत अंबिका हरिथ (मुंबई) हिने समृद्धी घाडीगावकर (ठाणे) हिचे आव्हान २५-७, ३-२५, २५-५ असे परतावून विजेतेपद पटकावले. महिलांच्या तृतीय क्रमांकाच्या लढतीत काजल कुमारी (मुंबई) हिने प्राजक्ता नारायणकर (मुंबई उपनगर) हिच्यावर २२-१३,२५-०० अशी मात केली.

महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे कार्याधक्ष भारत देसडला, कमळ नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष सतीशचंद्र पाटील, महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे सेक्रेटरी अरुण केदार, सहसचिव केतन चिखले, खजिनदार अजित सावंत, यतीन ठाकूर, विमालकुमार मेहता, महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे उपाध्यक्ष तथा रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश तुळपुळे, दीपक साळवी, द्वारकानाथ नाईक, प्रदीप नाईक आदी मान्यवरांच्या उपस्थितीत स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले.

प्रविंदर सिंग ग्रोवर यांनी स्पर्धेचे पंच प्रमुख म्हणून काम पहिले. आशिष बागकर यांनी सहाय्यक पंच प्रमुख म्हणून काम पाहिले. ललित भिसे यांनी सूत्रसंचालन केले, तर अभिजित तुळपुळे यांनी आभार मानले.

### महत्त्वाचे निकाल

**पुरुष एकेरी :** अंतिम फेरी-प्रशांत मोरे (मुंबई) वि. वि संदीप दिवे (मुंबई उपनगर) २५-४, २५-७, तृतीय क्रमांक योगेश परदेशी (पुणे) वि. वि. सागर वाघारे (पुणे) २५-००, २४-१३, उपांत्य फेरी-संदीप दिवे (मुंबई उपनगर) वि. वि सागर वाघारे (पुणे) २३-८, २०-१३, प्रशांत मोरे (मुंबई) वि. वि. योगेश परदेशी (पुणे) १४-२५, २५-१०, २५-००

**महिला एकेरी :** अंतिम फेरी-अंबिका हरिथ (मुंबई) वि. वि समृद्धी घाडीगावकर (ठाणे) २५-७, ३-२५, २५-५, तृतीय क्रमांक काजल कुमारी (मुंबई) वि. वि. प्राजक्ता नारायणकर (मुंबई उपनगर) २२-१३, २५-००, उपांत्य फेरी-अंबिका हरिथ (मुंबई) वि. वि. प्राजक्ता नारायणकर (मुंबई उपनगर) १९-१८, २५-०८ वि. वि., समृद्धी घाडीगावकर (ठाणे) वि. वि. काजल कुमारी (मुंबई) २६-००, १४-००.

### स्पर्धेत २७ स्लॅमची नोंद

तीन दिवस खेळल्या गेलेल्या या स्पर्धेत एकूण २७ स्लॅमची नोंद झाली, ज्यात २० व्हॉईट आणि सात ब्लॅक स्लॅमचा समावेश आहे. महिलांमध्ये समृद्धी घाडीगांवकर हिने एकमेव स्लॅमची नोंदवला.



# रायगड जिल्हा वरिष्ठ गट अजिंक्यपद निवड चाचणी कुस्ती स्पर्धा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा कुस्तीगीर संघ व पनवेल तालुका कुस्तीगीर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हा वरिष्ठ गट अजिंक्यपद निवड चाचणी कुस्ती स्पर्धा नावडे येथील परशुराम जोमा म्हात्रे विद्यालय या ठिकाणी आयोजित करण्यात आल्या होती.

या स्पर्धेचे उद्घाटन उत्साहात झाले. या वेळी महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे खजिनदार सुरेश पाटील (ठाणे) हे स्पर्धा निरीक्षक म्हणून उपस्थित होते. या वेळी त्यांच्यासमवेत राज्याचे कार्यकारिणी सदस्य सुभाष ढोणे कल्याण तसेच जिल्हा कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष सुभाष घासे, सरचिटणीस मारुती आडकर, सहचिटणीस हिरामण भोईर, तांत्रिक चिटणीस राजाराम कुंभार, खजिनदार गजानन हातमोडे, अलिबाग तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष जयेंद्र भगत, कर्जत तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष भगवान धुळे, पेण तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष हरिश्चंद्र शिंदे, सदस्य रवींद्र घासे जयराम गवते, विलास पाटील, दत्तात्रय पाटील, दीपक भुसारी, जगदीश मरागजे, पहलवान कृष्णा भोपी, दिलीप कचरे, पंढरीनाथ पाटील, रमेश ढवाळकर तसेच पनवेल तालुका कुस्तीगीर संघाचे पदाधिकारी भरत पाटील, बबन पाटील, गजानन हातमोडे, जयराम गवते, अशोक पाटील, नारायण भोपी, क्रीडाप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी राष्ट्रीय शालेय कुस्ती स्पर्धेत कांस्यपदक विजेती क्षितिजा जगदीश मरागजे आणि राज्य रौप्यपदक विजेता प्राण जयेंद्र भगत यांचा सत्कार करण्यात आला. स्पर्धेत रायगड जिल्हा क्रीडा कार्यालयाचे एनआयएस कुस्ती कोच तथा पंच प्रमुख संदीप वांजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पंच म्हणून कल्याणचे गणेश पाटील व प्रज्वलीत ढोणे, रायगडचे राजाराम कुंभार, वैभव मुकादम, सुनील नांदे, सावळाराम पायमोडे, जितेंद्र गावंड, रूपाली शिंदे, अविनाश शिंदे, सुधाकर पाटील इत्यादींनी कुस्ती पंचाचे काम निर्विवादपणे पार पाडले.

स्पर्धेत प्रथम क्रमांकाने विजयी झालेले सर्व कुस्तीगिरांची धाराशीव येथे होणाऱ्या ६५व्या वरिष्ठ गट राज्य अजिंक्यपद व महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत रायगड जिल्ह्याच्या वतीने सहभागी होतील.

### विभागनिहाय निकाल

**माती विभाग**

५७ किलो प्रथम श्रीनाथ पाटील अलिबाग, द्वितीय विजय धुळे कर्जत, ६१ किलो प्रथम साजन पावशे पनवेल, द्वितीय विदीत पाटील अलिबाग, ६५ कि. प्रथम ओंकार गायकर पनवेल, द्वितीय निलेश कदम कर्जत, ७० कि. प्रथम किरण ढवळे पनवेल, द्वितीय रोशन धुळे कर्जत, ७४ कि. प्रथम श्रेयस करे, द्वितीय प्रवीण धुळे कर्जत, ७९ कि. प्रथम जयेश खरमारे खालापूर, द्वितीय आर्य थळे अलिबाग, ८६ कि.शुभम वरखडे पनवेल, द्वितीय प्रशांत पाटील अलिबाग, ९२ कि. प्रथम विकास पावशे पनवेल, द्वितीय अंश घोडसेकर अलिबाग. ९७ कि. प्रथम चेतन शेळके पनवेल, द्वितीय रोहित शेळके अलिबाग, ८६ ते १२५ (महाराष्ट्र केसरी गट प्रथम निमिष घरत अलिबाग, द्वितीय संदेश मरागजे खालापूर.

**गादी विभाग**

५७ किलो प्रथम सोयल शेख खालापूर, द्वितीय सुरज जोशी कर्जत, ६१ कि. प्रथम रवींद्र चौधरी पनवेल, द्वितीय अनिवृद्ध शिंदे कर्जत, ६५ कि. प्रथम आदेश मढवी पनवेल, द्वितीय पंकज जोशी कर्जत, ७० कि. प्रथम सुनील खंदाळे खालापूर, द्वितीय प्रतिक हातमोडे पनवेल, ७४ कि. प्रथम दिवेश पालांडे खालापूर, द्वितीय सुजल लडगे अलिबाग, ७९ कि. प्रथम ओंकार निंबळे खालापूर, द्वितीय निखील पाटील अलिबाग, ८६ कि. प्रथम यश कडवे अलिबाग, द्वितीय विवेक माळी कर्जत, ९२ कि. प्रथम शंकर जाधव पनवेल, द्वितीय यश जांभळे अलिबाग, ९७ कि. प्रथम कुलदीप पाटील अलिबाग, ८६ ते १२५ महाराष्ट्र केसरी गट प्रथम ऋषिकेश देशमुख खालापूर, द्वितीय जीत नाईक अलिबाग.

# क्रीडा स्पर्धेत आवरे शाळेचे यश

## अक्षा गावंडची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

आत्माराम ठाकूर मिशन संचलित आवरे येथील जानकीबाई जनार्दन ठाकूर इंग्रजी माध्यम शाळेच्या विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत यश प्राप्त केले आहे. यापैकी अक्षा उत्तम गावंड हिने ज्युदोमध्ये १४ वर्षाखालील मुंबई विभागात प्रथम आली. तिची यासाठी राज्य स्तरावर निवड झाली आहे. याशिवाय विभागीय स्तरावर तनिष्का गावंड, वेदांत गावंड व नियती ठाकूर यांनी कांस्यपदक जिंकले

तालुकास्तरावर १४ वर्षाखालील मुलींचा कबड्डी संघ व १४ वर्षाखालील मुलांच्या खो-खो संघाला द्वितीय क्रमांक मिळाला. थाळीफेक स्पर्धेत श्रीची वर्तक द्वितीय क्रमांक, रिले स्पर्धेत सार्थकी पाटील, सानिया गावंड, गौरी गावंड, रितिका गावंड व सृष्टी म्हात्रे यांना द्वितीय क्रमांक मिळवला. १००० मीटर धावण्यात अनुक्रमे मोहित म्हात्रे व यश गावंड द्वितीय व तृतीय क्रमांक मिळाला. लांब उडीमध्ये मोहित म्हात्रे तृतीय, थाळी फेकमध्ये अर्थव गावंड द्वितीय, भाला फेकमध्ये प्रभात ठाकूर याने तृतीय क्रमांक मिळवला. त्याचप्रमाणे रायगड विभागात सन २०२३-२४ या वर्षी ज्युदो स्पर्धेत जास्त पदके मिळवणारी म्हणून आवरे शाळा घोषित करण्यात आली.



राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा ३१ ऑक्टोबर रोजी सांगली येथील जिल्हा क्रीडा संकुलात होणार आहे. यामध्ये अक्षा गावंड सहभागी घेणार आहे.

तालुका व जिल्हास्तरीय स्पर्धेत यशस्वी खेळाडूंना क्रीडा शिक्षक शुभम ठाकूर यांनी मार्गदर्शन केले. मुख्याध्यापिका निकीता म्हात्रे, संस्थेचे अध्यक्ष अशोक ठाकूर, खजिनदार वामन ठाकूर, सचिव अलका ठाकूर, विश्वस्त सिंधू ठाकूर, प्रसाद ठाकूर, शिक्षक पालक संघाच्या उपाध्याक्ष शुभांगी पाटील व सदस्यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

## नॅशनल गेम्समध्ये सुभाष पाटील पंचपदी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

३७वे नॅशनल गेम्स गोवा येथे होत असून यातील तायक्वांदो स्पर्धेसाठी पंच म्हणून रायगडचे सुपूत्र असलेले आंतरराष्ट्रीय पंच व प्रशिक्षक तसेच कॉमनवेल्थ तायक्वांदो युनियनचे सदस्य सुभाष पाटील यांची पंचपदी निवड झाली आहे.



सुभाष पाटील हे सातवी डिग्री ब्लॅक बेल्ट व आंतरराष्ट्रीय पंच आहेत. त्यांनी आतापर्यंत अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पंच म्हणून कामगिरी बजावली आहे. त्याचप्रमाणे ते विविध तायक्वांदो परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत.

नॅशनल गेम्ससाठी तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र व रायगड तायक्वांदो असोसिएशनचे पदाधिकारी तसेच पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर व इतर मान्यवरांनी सुभाष पाटील यांना शुभेच्छा दिल्या.

# महेंद्रसिंह धोनी ‘एसबीआय’चा ब्रँड ॲम्बॅसेडर

## मार्केटिंग, जाहिरात जबाबदारी

**रांची : वृत्तसंस्था**

दिवाळीपूर्वी स्टेट बँक ऑफ इंडियाने भारतीय क्रिकेटपटू आणि माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनीची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती केली आहे. सार्वजनिक क्षेत्रातील सर्वांत मोठी बँक म्हणजेच एसबीआयचा ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून धोनी मार्केटिंग आणि जाहिरातीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.



स्टेट बँक ऑफ इंडियाचे अध्यक्ष दिनेश खारा यांनी दिलेल्या माहितीनुसार एसबीआयचा ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून एमएस धोनीचा समावेश करताना आम्हाला खूप आनंद होत आहे. धोनीच्या एसबीआयसोबतच्या सहकार्यामुळे आमच्या ब्रँडला नवी ओळख मिळणार आहे. हा निर्णय एक भागीदारी आहे. आमचा उद्देश विश्वास, सचोटी आणि अटूट समर्पणाने देश आणि आमच्या ग्राहकांची सेवा करण्याची आमची वचनबद्धता आणखी मजबूत करणे हे आहे.

# भारताने टाकले न्यूझीलंडला मागे

## वर्ल्डकपमध्ये सर्वाधिक सामने जिंकणारा बनला दुसरा संघ

**लखनऊ : वृत्तसंस्था**

एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने विजयी घोडदौड कायम राखत इंग्लंडला धूळ चारली. यंदाच्या विश्वचषकात भारताचा हा सलग सहावा विजय आहे. भारताने या स्पर्धेत आतापर्यंत एकूण सहा सामने खेळले असून सर्व सामने जिंकले आहेत. या विजयासह भारत विश्वचषक गुणतालिकेत पहिल्या क्रमांकावर पोहचला आहे. याशिवाय भारताने विश्वचषकाच्या इतिहासात एक नवा पराक्रमही केला आहे.



विश्वचषकाच्या सामन्यात इंग्लंडला पराभूत केल्यानंतर भारत वर्ल्डकपच्या इतिहासात सर्वाधिक सामने जिंकणारा दुसरा संघ बनला आहे. न्यूझीलंडला मागे टाकत भारताने विश्वचषकातील ५९ सामने जिंकले आहेत. या यादीत भारताच्या पुढे आता फक्त एकच संघ आहे, तर दुसरीकडे इंग्लंडने विश्वचषकात सलग चार सामने गमावण्याचा नकोसा रेकॉर्ड केला आहे.

विश्वचषकातील सर्वाधिक सामने जिंकण्याचा यादीत पहिल्या क्रमांकावर ऑस्ट्रेलिया संघ आहे. ऑस्ट्रेलियाने आतापर्यंत सर्वात जास्त एकूण ७३ विश्वचषक सामने जिंकण्याचा विक्रम केला आहे. आता या यादीत दुसऱ्या क्रमांकावर भारत आहे. भारताने ५९ विश्वचषकात सामन्यांमध्ये विजय मिळवला आहे. या यादीत भारतानंतर न्यूझीलंडचा संघ तिसऱ्या स्थानावर आहे. न्यूझीलंडने आतापर्यंत एकूण ५८ विश्वचषक सामने जिंकले आहेत.

### इंग्लंडच्या नावे लाजिरवाणा विक्रम

विश्वचषकात भारताविरुद्धचा सामना हरल्यानंतर इंग्लंड संघाने नकोसा विक्रम आपल्या नावावर केला आहे. विश्वचषकाच्या इतिहासात पहिल्यांदाच इंग्लंड क्रिकेट संघ सलग चार सामने पराभूत झाला आहे. यापूर्वीच्या सर्व विश्वचषक स्पर्धेत इंग्लंडसोबत असे कधीही घडलेलं नाही. यंदाच्या विश्वचषकात गतविजेत्या इंग्लंडचे आव्हान जवळपास संपले आहे. इंग्लंडचे तीन सामने बाकी आहेत.

# वर्ल्डकपमध्ये दोनदा सामनावीर पुरस्कार जिंकणारा रोहित पहिला भारतीय कर्णधार



**मुंबई : प्रतिनिधी**

एकदिवसीय विश्वचषकाच्या सामन्यात भारताने इंग्लंडचा १०० धावांनी पराभव केला. या विजयात भारताचा कर्णधार रोहित शर्माने महत्त्वाची भूमिका बजावली. या सामन्यात सामनावीर पुरस्कार जिंकून रोहितने नवा विक्रम रचला आहे. विश्वचषकाच्या इतिहासात दोन वेळा सामनावीर पुरस्कार जिंकणार तो पहिला भारतीय कर्णधार ठरला आहे.

सलामीला उतरलेल्या कर्णधार रोहितने संघाला दमदार सुरुवात करून देत १०१ चेंडूत ८७ धावांची खेळी केली होती. यादरम्यान रोहित शर्माने १० चौकार आणि तीन षटकार ठोकले. सामन्याची या विजयी खेळीसाठी रोहित शर्माला ’प्लेअर ऑफ द मॅच’ पुरस्कार देण्यात आला. रोहित एकदिवसीय विश्वचषकात सर्वाधिक सामनावीर पुरस्कार जिंकणारा दुसरा फलंदाज बनला आहे. या यादीत भारतीय संघाचा माजी महान फलंदाज सचिन तेंडुलकर पहिल्या क्रमांकावर आहे. सचिनला नऊ वेळा सामनावीराचा पुरस्कार मिळाला आहे. या यादीत ऑस्ट्रेलियाचा माजी वेगवान गोलंदाज ग्लेन मॅकग्रा तिसऱ्या क्रमांकावर आहे. मॅकग्राने सामनावीराचा पुरस्कार जिंकला आहे.

दरम्यान, आयसीसी क्रमवारीत विराट कोहलीच अव्वल आहे. इंग्लंडविरुद्ध सामनावीराचा पुरस्कार जिंकल्यानंतर रोहित आयसीसी स्पर्धांमध्ये सर्वाधिक वेळा सामनावीर पुरस्कार जिंकणारा तिसरा फलंदाज ठरला आहे. विराट कोहली आणि ख्रिस गेल यांना आयसीसी स्पर्धेत सर्वाधिक ११ वेळा प्लेअर ऑफ द मॅच पुरस्कार मिळाला आहे.

# विराट, रोहित, केन आवडते खेळाडू -बाबर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

यंदाच्या विश्वचषकात पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझमची कामगिरी काही विशेष झाली नाही आणि त्याचा संघही विश्वचषकातून बाहेर होण्याच्या मार्गावर आहे. बाबरच्या कर्णधारपदाबरोबरच त्याच्या फलंदाजीवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. भरपूर टीका होत असताना बाबरने सांगितले की, त्याला कोण फलंदाज आवडतात.

बाबर आझमने भारत आणि इंग्लंड यांच्यातील सामन्यापूर्वी स्टार स्पोर्ट्सवर म्हणाले की, विराट कोहली, रोहित शर्मा आणि केन विल्यमसन हे माझे आवडते फलंदाज आहेत. हे तिघे जगातील अव्वल खेळाडू आहेत. यामागील कारण म्हणजे ते संघाला कठीण परिस्थितीतून बाहेर काढतात आणि विजय मिळवून देतात.

पाकिस्तानच्या कर्णधाराने पुढे सांगितले की, त्याला रोहित आणि विराट इतके का आवडतात. बाबर म्हणाला, विराट, रोहित आणि केन विल्यमसनची एक गोष्ट मला सर्वांत जास्त आवडते ती म्हणजे ते संघाचा डाव सावरत मोठी धावसंख्या कशी उभारता येईल किंवा धावसंख्येचा पाठलाग कसा करायचा हे यातून शिकता येईल. चांगल्या गोलंदाजांविरुद्धही सहज धावा करतात हेच या तिघांकडून मी शिकण्याचा प्रयत्न करतो.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com